मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी


■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४१ ■ गुरुवार, २९ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# अजित दादांना आज अखेरचा निरोप!



## पार्थिवावर सकाळी ११ वाजता बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान मैदानात अंत्यसंस्कार

**मुंबई, प्रतिनिधी :** भीषण विमान दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर आज (दि.२९) त्यांच्या कर्मभूमीत अर्थात बारामती येथेच शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

आज सकाळी सर्वप्रथम अंत्ययात्रा निघेल, त्यानंतर सकाळी ११ च्या सुमारास बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान मैदानात त्यांच्यावर अंत्यसंस्कार होतील. प्रशासनाकडून त्याची तयारी सुरू झाली आहे.

**आज सकाळी ९ वाजता अंत्ययात्रा**

अजित पवार यांचे पार्थिव आज सायंकाळी चार वाजल्यापासून रात्री उशीरापर्यंत विद्या प्रतिष्ठान, विद्या नगरी चौक येथे सर्वसामान्यांच्या अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. तर, उद्या सकाळी अंत्ययात्रा निघेल. सकाळी ९ वाजता गदीमा सभागृहापासून अंत्ययात्रेला सुरूवात होईल आणि विद्या प्रतिष्ठान चौक, भिगवण रोड सेवा रस्ता मराठी शाळेच्या गेटने विद्या प्रतिष्ठानच्या गेटवर जाईल.

**मोदी, शहा उपस्थित राहणार**

अजित पवारांवरील अंत्यसंस्कारावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा देखील बारामतीत उपस्थित राहणार आहेत. तसेच, दादांना अखेरचा निरोप देण्यासाठी पुणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून विविध राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

अजित दादांच्या निधनामुळे बारामतीतील सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आले असून, संपूर्ण शहरात शोकाकुल वातावरण आहे.

दरम्यान, राज्य सरकारने २८ ते ३० जानेवारी, तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीत महाराष्ट्रातील ज्या इमारतींवर नियमितपणे राष्ट्रध्वज फडकविला जातो, त्या सर्व ठिकाणी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येईल. तसेच या कालावधीत कोणतेही शासकीय मनोरंजन कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत.

## () थोडक्यात ()

### राज्यात तीन दिवसांचा राजकीय शोक जाहीर

**ठाणे :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित अशाताई आनंतराव पवार यांचे काल खाजगी विमान दुर्घटनेत आकस्मिक निधन झाले. राज्य सरकारतर्फे त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तीन दिवसांचा राजकीय शोक जाहीर करण्यात आला आहे. सर्व शासकीय कार्यालयांवर २८ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकविण्यात येणार आहे. ज्या कार्यालयांमध्ये ध्वज नियमित फडकविला जातो, त्या सर्व इमारतींसाठी हा नियम बंधनकारक राहील. या काळात राज्यात कोणतेही अधिकृत मनोरंजनाचे कार्यक्रम होणार नाहीत, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागाने दिली. उपमुख्यमंत्री पवार यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर २८ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. अशी माहिती शासनाच्या प्रोटोकॉल विभागाचे अवर सचिव एच. पी. बाविस्कर यांनी अधिकृत पत्राद्वारे दिली.

### ठाण्यातील काही भागात शुक्रवारी ६ तास पाणी नाही



**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या स्वत:च्या पाणी पुरवठा योजनेतील किरवली येथे मुख्य जलवाहिनी मधून पाणी गळती होत असून सदरची पाणी गळती बंद करण्याचे तसेच इंदिरानगर संपची साफसफाई करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सकाळी ९.०० पासून दुपारी ३.०० वाजेपर्यंत ०६ तासांचा स्वत:च्या पाणी पुरवठा योजनेचा शटडाऊन घेणे आवश्यक आहे. परिणामी, सदर दिवशी मे. स्टेम प्राधिकरणाचा पाणीपुरवठा झोनिंग करुन सुरु ठेवण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यत घोडबंदर रोड, वर्तकनगर, ऋतुपार्क, जेल, गांधीनगर, रुस्तमजी, सिध्दांचल, समतानगर, सिध्देश्वर, इटर्निटी, जॉन्सन, इंदिरानगर, श्रीनगर, लोकमान्यनगर, सावरकरनगर, रुपादेवी पाडा, किसननगर इत्यादी भागात ०६ तासासाठी पाणीपुरवठा बंद राहणार आहे. या शटडाऊनमुळे पाणीपुरवठा पूर्वपदावर येईपर्यत पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. तरी नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करुन ठेवावा व महापा लिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# द्रोनागिरीत चिमुकल्यांचा 'गुरुकुल' अविष्कार खेळ आणि कलेच्या माध्यमातून घडतोय उद्याचा सुजाण नागरिक!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : २२जानेवारी २०२६ द्रोणागिरी परिसरातील नामांकित 'गुरुकुल प्री स्कूल अँड डे केअरचा' वार्षिक स्नेहसंमेलन व क्रीडा दिन सोहळा अत्यंत आनंदी आणि उत्साह पूर्ण वातावरणात पार पडला. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्दीने आत्मविश्वासाने आणि कलागुणांच्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षकांची व पालकांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात चिमुकल्यांच्या बहारदार नृत्य आणि अभिनयाने झाली. त्यानंतर आयोजित क्रीडा स्पर्धांमध्ये मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. खेळांमधून संघभावना शिस्त आणि आत्मविश्वास कसा निर्माण होतो याचे जिवंत दर्शन यावेळी घडले. प्राचार्या दीपाश्री नाखवा यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा यशस्वी झाला. शिक्षक



आणि कर्मचाऱ्यांच्या मेहनतीमुळे या कार्यक्रमाला एका वेगळ्या उंचीवर नेले. गुरुकुल प्री स्कूल मध्ये केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्ले वे मेथड द्वारे शिक्षण दिले जाते मुले खेळता खेळता आनंदात शिकतात. ज्यामुळे त्यांचा सर्वांगण विकास होतो मुलांचे मेहनतीचे कौतुक म्हणून विजेत्यांना आणि सहभागी विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

जेव्हा मुलांनी आत्मविश्वासाने आपली कला सादर केली तेव्हा प्रत्येक पालकाचे मन अभिमानाने भरून आले. आजच्या स्पर्धेच्या युगात गुणांची शर्यत न लावता मुलांच्या नैसर्गिक कलागुणांना फुलासारखी उमलवण्याची संधी गुरुकुलनी दिली आहे. आपल्या पाल्याच्या बालपणातील हे सोनेरी क्षण जपण्यासाठी आणि त्यांच्या भविष्याचा भक्कम पाया रचण्यासाठी गुरुकुल प्री स्कूल ही केवळ शाळा नाही तर एक मायेचे घर ठरत आहे. टाळ्यांच्या कडकडाटात आणि आनंदाश्रूने भारावलेल्या वातावरणात या सोहळ्याची सांगता झाली .तुमच्या पाल्याला सकारात्मक संस्कारक्षम आणि उत्तम नागरिक बनवणारे शिक्षण हवे असेल तर गुरुकुल प्री स्कूल हा सर्वोत्तम पर्याय आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासाची सांगड घालणाऱ्या शाळेला पालकांनी नक्की भेट द्यावी .असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# नवी मुंबईत एमजीएम मेडिकल कॉलेज च्या वतीने "मॅपकॉन सीएमईची'चे यशस्वी आयोजन

### देशभरातून ५० नामवंत तज्ज्ञ आणि ३८३ डॉक्टर्स उपस्थित




**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई, प्रतिनिधी :** नवी मुंबई एमजीएम मेडिकल कॉलेज, कामोठे यांच्या वतीने "मॅपकॉन सीएमईची'चे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन एमजीएम आरोग्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ शशांक दळवी यांच्या हस्ते करण्यात आले, कार्यक्रमाचे सन्माननीय अतिथी आयसीएमआरच्या शास्त्रज्ञ डॉ. मनीषा घाटे आणि ऑलएमएस दिल्लीच्या मेडिसिनचे प्राध्यापक डॉ. तुषार सहगल होते.

या वर्षीच्या "मॅपकॉन सीएमईची'चे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रथमच आयोजित करण्यात आलेली कॅडॅव्हेरिक बोन मॅरो कार्यशाळा, जी तिच्या प्रात्यक्षिक आणि हाताळणी प्रशिक्षणासाठी विशेष प्रशंसनीय ठरली. तसेच पॅथॉलॉजीमधील ANA कार्यशाळा हे आणखी एक महत्त्वाचे आकर्षण ठरले, ज्यामुळे सहभागींच्या ऑटोइम्यून आजारांच्या निदानाविषयी आणि प्रयोगशाळा अहवालांच्या अर्थ लावण्याविषयीची समज अधिक सखोल झाली. एओपी महाराष्ट्र चॅप्टर आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट अँड मायक्रोबायोलॉजिस्ट (एमएपीपीएम) यांच्या सहकार्याने झाले.

१९८९ साली स्थापन झालेल्या एमजीएम मेडिकल कॉलेज, कामोठे येथील पॅथॉलॉजी विभागाची शैक्षणिक परंपरा गौरवशाली राहिली आहे. या विभागाने आजपर्यंत वैद्यक शास्त्रात अनेक कार्यक्रम केले. इम्युनोफ्लोरेसेन्स आणि फ्लो सायटोमेट्री यांसारख्या प्रगत तंत्रांमध्ये ११ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे, जे आधुनिक पॅथॉलॉजीच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले

या कॅडेव्हेरिक कार्यशाळेत संपूर्ण भारतातील वैद्यकीय महाविद्यालयातील ३८३ डॉक्टर्स उपस्थित होते, त्यांना 50 पॅथॉलॉजी क्षेत्रातील अनेक नामवंत तज्ज्ञांची उपस्थिती मार्गदर्शन केले . त्यामुळे हा कार्यक्रम ज्ञानविनिमय, नेटवर्किंग आणि व्यावसायिक विकासासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरला. कार्यक्रमात डायग्नोस्टिक पॅथॉलॉजीमधील अद्ययावत विषयांवर व्याख्याने, पॅनल चर्चा आणि संवादात्मक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

# राज्यात अनेक ठिकाणी 'अवकाळी' पाऊस; मुंबई, ठाणे, रायगडमध्येही रिमझिम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी :**

हवामान खात्याने दिलेला अंदाज खरा ठरला असून मंगळवारी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. तर, अनेक जिल्ह्यांना गारपीठीचा तडाखा बसला आहे. पुणे, नाशिक, जळगाव, धुळेसह अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस पडला आहे. महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढला होता अशातच हवामान खात्याने 'यलो अलर्ट' जारी केला आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे ओलसर वारे सक्रिय झाले आहेत, ज्यामुळे राज्याच्या अनेक भागात अवकाळी पाऊस पडला आहे. मंगळवारी सकाळी मुंबई आणि त्याच्या आसपासच्या ठाणे, रायगड परिसरात अचानक झालेल्या रिमझिम पावसाने सर्वांनाच आश्चर्यचकित केले.

**६ जिल्ह्यांमध्ये 'यलो अलर्ट'**

मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. मराठवाड्यातील छत्रपती



संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, नांदेड आणि लातूरमध्ये ढगाळ वातावरण राहील आणि विखुरलेल्या गडगडाटासह पाऊस पडेल. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार येथे दिवसभर ढगाळ वातावरण राहून हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता.

**जळगांवमध्ये विजांचा कडकडाट**

जळगावमध्ये सायंकाळच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळल्या. जळगावसह जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागांमध्ये अवकाळी पाऊस पडला. सकाळपासून ढगाळ वातावरण होते. गेल्या काही दिवसापासून निफाडसह येवला तालुक्यात परिसरात ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. मात्र, आज अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने आठवडे बाजारासाठी आलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली. ग्रामीण भागात शेती पिकाचे नुकसान झाले असल्याची माहिती मिळाली आहे.

# लोहारी खुर्द येथे त्रिदिवसीय प्रजासत्ताक सोहळा उत्साहात संपन्न!!

**दैनिक युवक आधार**
**दिलीप कराळे, अकोट प्रतिनिधी** : अकोट तालुक्यातील लोहारी खुर्द येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला त्रिदिवसीय सोहळा मोठ्या उत्साहात आणि भरगच्च उपस्थितीत संपन्न झाला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत व जि. प. शाळा लोहारी खुर्द यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सोहळ्याच्या पहिल्या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी निबंध, चित्रकला, वक्तृत्व व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी गावातील नोकरीवर असणाऱ्या व जिप शाळेत शिकलेल्या व्यक्तींचा सत्कार सोहळा व माजी विद्यार्थी स्नेहमेळावा पार पडला. यासाठी मोठ्या प्रमाणात माजी विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली. दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात माता पालक मेळावा आणि हळदी कुंकू पार पडले तर त्यानंतर महिलांसाठी खास कार्यक्रम खेळ पैठणीचा रंगला. या कार्यक्रमाचे आकर्षण होत्या आर जे दिव्या. या कार्यक्रमास मोठया प्रमाणात महिलांची उपस्थिती होती.

तिसऱ्या दिवशी प्रजासत्ताक दिनी सकाळी शाळेतील ध्वजारोहण मुख्याध्यापक




नितीन धोरण यांच्या हस्ते तर ग्रामपंचायत कार्यालयातील ध्वजारोहण सरपंच पूजाताई म्हैसने यांच्या हस्ते पार पडले. त्यानंतर उपस्थितांना तंबाखूमुक्तीबाबत व असाक्षरमुक्त गावाची शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी संगीत कवायत सादर केली. याप्रसंगी स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी सरपंच पुजाताई म्हैसने, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश वानखडे, तंटामुक्ती अध्यक्ष अनिल ठाकरे, भिमरावजी ठाकरे, अतुल म्हैसने, नानाभाऊ सपकाळ, पद्माकर देवर, प्रफुल्ल म्हैसने, वैशालीताई म्हैसने, सुमेधा डोबाळे, अर्चना वानखडे, राधेश्याम फुसे, सुधिर म्हैसने, ग्रामसेवक शैलजा पाटील, मुख्याध्यापक नितीन धोरण, शिक्षिका सोनाली उज्जैनकर, सोनाली निचळ, रुपाली ढवळे, रमेश डिक्कर, भुजिंगराव इंगळे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अल्पसंख्याक युवकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी उपाययोजनांवर भर द्यावा; जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर जिल्हास्तरीय समितीची बैठक

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील :** अल्पसंख्याक समाजातील युवकांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती साधण्यासाठी शासनाच्या सर्व योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून ठरवून दिलेल्या वेळेत योजनांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

अल्पसंख्याक युवकांच्या उन्नतीसाठी उपाययोजनांबाबत जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड, उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव तसेच शासकीय तंत्रनिकेतन, जिल्हा कौशल्य विकास व जिल्हा महिला व बालविकास विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत अल्पसंख्याक वस्तीगृहांच्या कामकाजाचा आढावा घेताना जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी अल्पसंख्याक विद्यार्थिनींच्या निवासासाठी सुरू असलेल्या बांधकामाला गती देण्याचे निर्देश दिले.

यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्याचे त्यांनी सांगितले.

नगरपालिका प्रशासनाअंतर्गत सुरू व प्रस्तावित कामांचे सविस्तर अहवाल समितीसमोर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच कौशल्य विकास विभागाने अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात रोजगार मेळावे आयोजित करून मायनॉरिटी इन्स्टिट्यूशन्सची ओळख निश्चित करावी, असे निर्देश देण्यात आले.



प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावर पाचवी, सहावी व सातवी वर्गातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी पायलट प्रकल्प राबवून गळतीचे प्रमाण शून्यावर आणण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्राथमिक शिक्षणानंतर सर्व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश मिळेल, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीसाठी शाळेमार्फत विद्यार्थ्यांचे अर्ज काळजीपूर्वक भरावेत व ठरवून दिलेल्या कालावधीत शिष्यवृत्तीचे वितरण पूर्ण करावे, असेही सांगण्यात आले.

उर्दू शाळांमध्ये गणित व विज्ञान विषयांच्या शिक्षकांची रिक्त पदे भरण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच मराठी शाळांमध्ये किमान २० विद्यार्थ्यांची मागणी असल्यास उर्दू भाषा ऐच्छिक विषय म्हणून सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. क्रीडा विभागाने शाळांमधील विविध खेळांमध्ये अल्पसंख्याक मुला-मुलींचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये व्यायामशाळा सुरू करून क्रीडा सुविधांचा विस्तार करावा.

जिल्हा नियोजन विकास समितीमधून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास मिळणाऱ्या निधीपैकी २० टक्के निधी अल्पसंख्याक शाळांसाठी राखीव ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच दिवसा रोजगार करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रात्रीच्या शाळा सुरू करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये सुरू करण्यासाठी कार्यवाही करावी. शासकीय तंत्रनिकेतनमध्ये आवश्यकतेनुसार अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसरी पाळी सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर प्रभावी जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले.

नगर विकास विभागाने अल्पसंख्याक बहुल भागात नागरी सुविधा, स्वच्छता, मलनिःसारण, आरोग्य सेवा व नियमित पाणीपुरवठा याबाबत विशेष दक्षता घ्यावी. कौशल्य विकास विभागाने असंघटित क्षेत्रात कार्यरत अल्पसंख्याकांना कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये आवश्यकतेनुसार अतिरिक्त पाळ्या सुरू कराव्यात.

महिला व बालविकास विभागाने अल्पसंख्याक महिला व बालकांपर्यंत विभागाच्या योजना पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

अल्पसंख्याक महिलांचा बचत गटांमध्ये सहभाग वाढविणे व त्यांना कायदेशीर सल्ला उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सार्वजनिक आरोग्य विभागाने अल्पसंख्याक बहुल भागात आरोग्य सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले.

सामाजिक न्याय विभागाने अल्पसंख्याक समुदायातील काही जातींना जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

जिल्हा महिला व बालविकास विभाग व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने संबंधित माहिती समितीसमोर सादर करावी.

तसेच शिक्षण विभागाने अल्पसंख्याक समुदायाच्या शाळांना वेळोवेळी भेटी देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

## मल्हारवाडी जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात; सामाजिक जागृतीवर दिला भर

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मल्हारवाडी (केंद्र: पालोद) येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण करत सामाजिक जागृतीवर विशेष भर दिला.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीने करण्यात आली. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सरस्वती पालोदकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन व ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थी, पालक आणि माता भगिनींनी



एकत्र येत व्यसनमुक्ती, असाक्षर निर्मूलन आणि मतदान जागृतीची सामूहिक शपथ घेतली.

ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्ती गीतांवर आधारित संगीत कवायत सादर केली . त्यानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात बालगीत, गोंधळ, पोवाडा, देशभक्तीपर गीते, लावणी, कोळीगीत आणि कृतीगीत अशा विविध कलागुणांचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणाला पालकांनी उत्स्फूर्त दाद दिली व भरघोस बक्षिसे देऊन प्रोत्साहन दिले.

शाळेच्या प्रगतीसाठी उपस्थित सर्व गावकरी आणि पालकांनी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी दिले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामचंद्र सपकाळ , सर्व सदस्य आणि पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आभार ज्येष्ठ शिक्षक संजय मोरे यांनी मानले.

## अल्पसंख्याक युवकांच्या उन्नतीसाठी ठोस उपाययोजना — जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** जानेवारी अल्पसंख्याक समाजातील युवकांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी सर्व शासकीय योजना प्रभावीपणे राबवाव्यात व प्रत्येक विभागाने समन्वयाने ठराविक वेळेत ठोस परिणाम दाखवावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.अल्पसंख्याक युवकांच्या उन्नतीसाठी जिल्हास्तरीय समितीची बैठक




जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी त्यांनी अल्पसंख्याक विद्यार्थिनींच्या वस्तीगृहाच्या कामांना गती देणे, शाळांमधील गळती रोखण्यासाठी विशेष प्रकल्प राबवणे, उर्दू शाळांमध्ये गणित-विज्ञान शिक्षक भरती करणे, तसेच अल्पसंख्याक बहुल भागात क्रीडा, आरोग्य व नागरी सुविधा वाढवण्याचे निर्देश दिले.

तसेच कौशल्य विकास विभागाने रोजगार मेळावे घेऊन युवकांना प्रशिक्षण व नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, उच्च व तंत्र शिक्षणासाठी महाविद्यालये व तंत्रनिकेतनांमध्ये आवश्यक पावले उचलावीत, महिला व बालविकास विभागाने अल्पसंख्याक महिला व बालकांपर्यंत योजना पोहोचवाव्यात, असेही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी स्पष्ट केले. "अल्पसंख्याक युवकांचा विकास म्हणजे जिल्ह्याच्या प्रगतीचा पाया आहे," असे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सांगितले.

## महाराष्ट्राचा दादा हरपला - लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भावुक प्रतिक्रिया

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे महत्वाचे नेते राज्याचे मुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आज सकाळी विमान अपघाताने निधन झाले आणि हे वृत्त कळताच मनाला खूप दुःख झाले. अजितदादांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला आहे. आकस्मिक असं संकट महाराष्ट्रावर आले. त्यांच्या निधनाची बातमी कळताच दोन तास मी स्तब्धच होतो, काय बोलावे सुचतच नाही. जनसामान्यांच्या बाबतीत अतिशय जिव्हाळा, प्रेम आपुलकी आणि तितक्याच तडफेने काम करणारे असे ते होते. त्यामुळे प्रत्येकाला वाटते कि आपल्या कुटुंबातील एक व्यक्ती हरपला आहे. अजितदादा यांची माझी जास्त वेळ भेटी झाल्या नसल्या तरी जेवढ्या भेटी झाल्यात त्यामध्ये आम्ही एकमेकांच्या मनातील बोलत होतो त्यामुळे त्यांचे आणि माझे जिव्हाळ्याचे नाते होते. काही महिन्यापूर्वी ईश्वरपूर येथे एका कार्यक्रमात भेट झाली होती. व्यासपीठावर आमच्यामध्ये दोन चार मिनिटे चर्चा झाली. त्या कार्यक्रमात त्यांनी बोलताना १२ कोटी जनतेचा उल्लेख करत आणि मला कल्पना नसलेले माझ्या विषयी ते कौतुकाने जाहीरपणे भरभरून बोलले. सर्वसामान्यांची कदर आणि ओळख असलेला हा नेता. सामान्य माणसाची कदर ओळखणारे, खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे ठामपणे सांगणारे असे नेतृत्व महाराष्ट्राने गमावल्याची आणि महाराष्ट्राचा दादा हरपल्याची भावुक प्रतिक्रिया लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केली.


**अजितदादांची कार्य अजोड - आमदार प्रशांत ठाकूर**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची ओळख कर्तव्यदक्ष आणि धडाडीचे नेते अशी होती. विमान अपघातात त्यांचे निधन झाले आणि त्यांच्या निधनाची बातमी सर्वांसाठी धक्कादायक पद्धतीचे वृत्त आहे. अजितदादांनी सदैव धडपडणाऱ्या, काम करणाऱ्या माणसाला आधार दिला आहे. विशेषत्वाने रायगड जिल्ह्यावर त्यांचे प्रेम होते. रायगड जिल्ह्यातील अनेक विकासकामांना त्यांनी पाठबळ दिले. ते पाहता संपूर्ण जिल्ह्यातला प्रत्येक राजकीय व सामाजिक कार्यकर्ता आज हळहळत आहे. अजितदादांच्या निधनाचे आज हे वृत्त ऐकल्यानंतर अनेकांना शोक अनावर झाला आहे. त्यांच्याशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला दुःख झाला आहे आणि यातून त्यांना सावरणे कठीण आहे. अजितदादांनी केलेले कार्य अजोड आहे. रायगड जिल्हा भाजपच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

## सिल्लोडच्या कल्याणी तुपे-गाडेकर यांचे राज्यस्तरीय यश; 'विज्ञान-गणित जादूगार' स्पर्धेत पटकावला तृतीय क्रमांक!

**योगेश पालोदकर/सिल्लोड:-** महाराष्ट्र शासन व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय 'विज्ञान आणि गणिताचा जादूगार' स्पर्धेत सिल्लोड तालुक्यातील वांगी बुद्रुक येथील पदवीधर शिक्षिका सौ. कल्याणी तुपे-गाडेकर यांनी देदिप्यमान यश संपादन केले आहे. संपूर्ण राज्यातून निवडण्यात आलेल्या ४० तज्ज्ञ स्पर्धकांमधून आपल्या कल्पक सादरीकरणाच्या जोरावर त्यांनी राज्यात तृतीय क्रमांक पटकावून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. विशेष म्हणजे, राज्यस्तरीय विजेत्यांच्या यादीत झळकणाऱ्या त्या राज्यातील एकमेव महिला शिक्षिका ठरल्या आहेत.

कल्याणी तुपे यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. प्रारंभी छत्रपती संभाजीनगर विभागीय स्तरावर त्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यानंतर पुण्यात पार पडलेल्या राज्यस्तरीय अंतिम




फेरीत त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि अध्यापन कौशल्याचा अप्रतिम संगम साधला. नवीन शैक्षणिक धोरणाच्या (NEP) धर्तीवर त्यांनी तयार केलेले गणिताच्या आणि विज्ञानाच्या जादूचे शैक्षणिक प्रयोग विशेष लक्षवेधी ठरले. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (AI) तंत्रज्ञानाचा शिक्षणातील प्रभावी वापर, विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देणारे वैज्ञानिक प्रयोग, वैदिक गणित क्लुप्त्या, अंकांची जादू आणि बुद्धीला आव्हान देणारे मजेशीर खेळ अशा विविधांगी प्रयोगांनी त्यांनी परीक्षकांचे मन जिंकले.

त्यांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल शिक्षण क्षेत्रासह राजकीय व सामाजिक स्तरावरून कौतुकाचा वर्षाव होत आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी चव्हाण मॅडम, गटविकास अधिकारी रत्नाकर पगार, गटशिक्षणाधिकारी रमेश ठाकूर, शिक्षण विस्तार अधिकारी राजीव फुसे, केंद्रप्रमुख महाजन सर , केंद्रीय मुख्याध्यापक सोनवणे सर, मुख्याध्यापक सुसुंदे सर यांच्यासह सर्व सहकारी शिक्षक आणि

> "विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन. एआय तंत्रज्ञान आणि विज्ञानातील गंमती विद्यार्थ्यांपर्यंत सोप्या भाषेत नेणे, हेच माझे उद्दिष्ट आहे. हे यश माझे एकटीचे नसून माझ्या शाळेचे आणि मार्गदर्शकांचे आहे."
>
> - सौ. कल्याणी तुपे-गाडेकर (विजेत्या शिक्षिका)

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सरपंच, सदस्य व वांगी बुद्रुक येथील ग्रामस्थांनी कल्याणी तुपे यांचे अभिनंदन केले आहे.

भविष्यातही विद्यार्थ्यांसाठी नवनवीन गोष्टी आत्मसात करून त्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा मानस कल्याणी तुपे यांनी यावेळी व्यक्त केला. त्यांच्या या यशामुळे सिल्लोड तालुक्याच्या शैक्षणिक प्रगतीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

## रजनीकांत बोरेले खरीददार - अडतदर मध्ये देशातील सर्वात जास्त तुरी 9000/- प्रति क्विंटल भाव

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :** पांढरकवडा येथील प्रख्यात व्हिसल ब्लोअर रजनीकांत डालूरामजी बोरेले यांची कृषी उत्पन्न बाजार समिति पांढरकवडा येथे धान्य खरेदी आणि अडत आहे शेतकऱ्यांच्या धान्य ला जास्तीत - जास्त भाव कसे देता येतात तो पर्यत्न त्यांचा असतो

देशात कुटल्याच मंडी किवा प्लांट मध्ये तुरीला भाव 8600 पेक्षा जास्त भाव नस्तानंना आज दिनांक 28/1/2026 रोजी दुपारी 1 वाजता रजनीकांत बोरेले यांनी धान्याचा लीलावाची बोली सुरु केलीत्यांनी बोली करीत 9000 /- रुपये भाव केला त्या नंतर तुरी 8800,8750,8600, 8500, आश्या प्रकारे लीलावा केला महत्वाची बाब म्हणजे बोरेले यांच्या खरेदी - अड़त मध्येच रेकॉर्ड बनते हे विशेष 28/ जनवरी/2026 रोजी देशातील कोणत्याही खाजगी किवा कृषी उत्पन्न बाजार समिति मध्ये



अथवा तुरी च्या मील (प्लांट) ला देखील 9000, रुपये तुरी ला भाव नाही आहे

रजनीकांत बोरेले यांच्या नावावर शेतकरी धान्य विक्री साठी घेवून येतात त्यांच्या कळे मामूल ही परंपरा शुद्धा नाही रजनीकांत बोरेले यांचे मत असे आहे की मामूल देने म्हणजे शेतकरी यांना लूटुन देने सारखे आहे त्यांची लीलावाची बोली बघण्या सारखी असते त्या मुळे पांढरकवडा मंडित शेतकरी यांना धान्य विक्री करीता आनायचे असल्यास पहेली पसन्ती बोरेले अडतदारी - खरीददारी मध्ये शेतकऱ्यांची राहते तुरी ला प्रचंड भाव असल्याने शेतकरी बांधवान मध्ये आनंदाची लाट पसरली आहे.

## तालुकास्तरीय स्पर्धा परीक्षेत दुधा शाळेचे घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र राजु शिंदे :** काळुबा महाराज सार्वजनिक वाचनालय दहिफळ खंदारे तालुका मंठा जिल्हा जालना च्या वतीने घेण्यात आलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्ताने तालुकास्तरीय स्पर्धा परीक्षे मध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा च्या विद्यार्थ्यांनी मिळवले घवघवीत यश. काळुबा महाराज सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने घेण्यात आलेली स्पर्धा ही दोन गटांमध्ये घेण्यात आली यामध्ये 6 ते 12 वयोगट यामध्ये प्रथम क्रमांक रणवीर लक्ष्मण शिंदे द्वितीय क्रमांक सोयम महादेव देशमुख, अविराज परमेश्वर लिपणे व तृतीय क्रमांक अक्षरा अशोक शिंदे ,अनिकेत भागवत देशमुख



यांनी पटकाविला. तसेच 13 ते 18 या वयोगटांमध्ये प्रथम क्रमांक सार्थक रामेश्वर खुळे द्वितीय क्रमांक भाग्यश्री गोकुळ शिंदे व तृतीय क्रमांक स्नेहल संजय जाधव या विद्यार्थ्यांनी पटकाविला . यामध्ये बक्षीस स्वरूपात रक्कम प्रथम क्रमांक 3000 द्वितीय क्रमांक 2000 व तृतीय क्रमांक 1000 याप्रमाणे एकूण बारा हजार रुपये या विद्यार्थ्यांना बक्षीस स्वरूपात मिळाले या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ 26 जानेवारीला जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथे काळोबा महाराज सार्वजनिक वाचनालयाचे कार्यवाहक सुनील पतंगराव जाधव यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला तसेच शाळेतील तिन्ही शिक्षकांचा स्पर्धा परीक्षेची पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला या सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सर सहशिक्षक श्री निलेश पिसे सर व श्री पंजाब दांदडे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने तसेच शाळा व्यवस्थापन समिती ग्रामपंचायत कार्यालय व सर्व पालकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# स्व. रावसाहेब निवासी मतिमंद विद्यालय येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**मनोज सुरोशे/महागाव (यवतमाळ) :** स्वर्गीय रावसाहेब निवासी मतिमंद विद्यालय येथे 77 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. देवळी येथील ज्येष्ठ समाजसेवक मोहन बाबू अग्रवाल यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक श्री मोहन बाबू अग्रवाल, शाळा प्रमुख जीवन टाले उपस्थित होते. सोबतच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि पालक वर्ग यांची उपस्थिती होती. महालक्ष्मी कामगार संघटनेचे पदाधिकारी त्यांनी मायेची उब अंतर्गत विद्यार्थ्यांना ब्लॅंकेटचं वाटप त्या ठिकाणी केले. या कार्यक्रमांमध्ये



विद्यार्थिनी कुमारी साक्षी चव्हाण हीणे लल्लाटी भंडार या गाण्यावर नृत्य केले नृत्य करून सगळ्या श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

यासोबतच महाराष्ट्र गित सादर करण्यात आले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळा प्रमुख श्री. जीवन टाले यांनी केले. तर संचालन ज्ञानेश्वर काळे यांनी केले.

# संत ज्ञानेश्वर विद्यालय वाडी रायता ळ तालुका प्रजासत्ताक दिन उत्साह साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रिसोड/रणजितसिंह ठाकुर** : कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भोकरखेडा येथील माननीय भागवतरावजी रंजवे होते तर



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून चिंचांबा पेन येथील माननीय समाजसेवक संत गजानन महाराज भक्त संतोष भाऊ मुंदडा होते तर विशेष अतिथी म्हणून वाशिम या ठिकाणाहून उपस्थित असलेले सुरेश भाऊ सोमाणी होते प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माननीय संतोष भाऊ मुंदडा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले कार्यक्रमाला उपस्थित भोकरखेडा येथील संभाजीराव गवळी गट ग्रामपंचायत सरपंच राधाबाई लक्ष्मण हागे संस्थेचे सचिव संजय कांबळे व विठ्ठल मोरे. राजू पठाण उपसरपंच उपस्थित होते . कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माननीय संतोष भाऊ मुंदडा यांचा शाळेमध्ये जन्म वाढदिवस साजरा करण्यात आला.

# स्त्री शक्तीचा जागर आणि मनोरंजनाचा धमाका" उरण महोत्सव २०२६ ला नक्की भेट द्या

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** घरची जबाबदारी सांभाळता सांभाळता जेव्हा एखादी माता भगिनी आपल्या कलागुणांना वाव देते तेव्हा खऱ्या अर्थाने समाजाचे सक्षमीकरण होते. महेश बालदी मित्र मंडळ आणि अस्तित्व (महिला सक्षमीकरण संस्था) यांनी उचललेले हे पाऊल केवळ एका महोत्सवासाठी नाही तर उरण मधील प्रत्येक जिद्दी महिलेच्या पंखांना बळ देण्यासाठी आहे.

दैनंदिन धावपळीत आपण स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी वेळ काढायला विसरतो ,तोच आनंद, तोच जिव्हाळा ,तोच शेजार धर्म पुन्हा एकदा अनुभवण्यासाठी या उरण महोत्सवात नक्की या ,आपल्या लेकी बाळींच्या हातातील कला पाहायला, आपल्या भागातील खाद्य संस्कृतीची चव चाखायला आणि आपल्या हक्काच्या माणसांना भेटायला हा महोत्सव म्हणजे एक हक्काचे व्यासपीठ आहे.

येथे केवळ स्टॉल्स नसतील तर त्यामागे एखाद्या भगिनींनी पाहिलेले स्वप्न असेल, तुम्ही दिलेली एक छोटी भेट किंवा तुम्ही केलेली खरेदी त्या भगिनीच्या मेहनतीचा सन्मान ठरेल




.चला तर मग आपल्या कुटुंबाचा हात धरून आनंदाची शिदोरी सोबत घेऊन या दोन दिवसात उरणच वैभव पुन्हा एकदा डोळ्यात साठवू या. घरगुती चवीचे अस्सल खाद्यपदार्थ जे तुमच्या जिभेवर रेंगाळतील, महिलांच्या हातातील हस्तकला आणि आकर्षक गृपयोगी वस्तू, आधुनिक आणि पारंपरिक कपड्यांची भव्य बाजारपेठ, मनोरंजनाचा धमाका, कुटुंबासमत सोबत आनंद घेण्यासाठी मनोरंजनात्मक कार्यक्रम, प्रत्येकासाठी खास लकी ड्रॉ हे या महोत्सवाचे खास आकर्षण आहे.

त्याचप्रमाणे फक्त महिलांसाठीच हि संधी नाही तर समस्त उरणमधील महिला , पुरुष इच्छुक व्यवसायधारकांनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा व आपल्या परिवारास घेऊन या महोत्सवास भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांकडून करतात आले आहे.

हा भव्य सोहळा ज्यांच्या मार्गदर्शनाखाली उभा राहत आहे ते म्हणजे उरणचे कार्यसम्राट आमदार श्री महेश बालदी साहेब आणि सौ.निता महेश बालदी, तसेच मान्यवरांमधे(माजी नगराध्यक्षा) सौ सायली म्हात्रे ,एड सौ राणी म्हात्रे (महिला मोर्चा अध्यक्षा), या सोहळ्याचे नेटके नियोजन करण्यासाठी संपूर्णा थळी (शहराध्यक्षा ), रजनी कोळी (नगरसेविका ),जान्हवी पंडित (माजी नगरसेविका) पूनम पाटेकर, सानिका कदम, हेमा घरत (अस्तित्व महिला सक्षमीकरण संस्था सभासद)

"एक पाऊल समर्थ उरण कडे! एक पाऊल महिलांच्या सन्मानाकडे"

ठिकाण: एन आय हायस्कूल

वेळ: ७ आणि ८ फेब्रुवारी सायंकाळी ५ ते रात्री १०.

जर तुम्हाला महोत्सवात आपला स्टॉल लावायचा असेल किंवा आपल्या व्यवसायाची जाहिरात करायचे असेल तर त्याकरता संपर्क ांक;९०२९६१७२६६/७२०८६९३१६८.

"उरण च्या वैभवासाठी आणि महिलांच्या सन्मानासाठी चला तर मग उरण महोत्सवात भेटूया"

# महाराष्ट्राचा दादा हरपला - लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भावुक प्रतिक्रिया

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे महत्वाचे नेते राज्याचे मुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आज सकाळी विमान अपघाताने निधन झाले आणि हे वृत्त कळताच मनाला खूप दुःख झाले. अजितदादांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला आहे. आकस्मिक असं संकट महाराष्ट्रावर आले. त्यांच्या निधनाची बातमी कळताच दोन तास मी स्तब्धच होतो, काय बोलावे सुचतच नाही. जनसामान्यांच्या बाबतीत अतिशय जिव्हाळा, प्रेम आपुलकी आणि तितक्याच तडफेने काम करणारे असे ते होते. त्यामुळे प्रत्येकाला वाटते



कि आपल्या कुटुंबातील एक व्यक्ती हरपला आहे. अजितदादा यांची माझी जास्त वेळ भेटी झाल्या नसल्या तरी जेवढ्या भेटी झाल्यात त्यामध्ये आम्ही एकमेकांच्या मनातील बोलत होतो त्यामुळे त्यांचे आणि माझे जिव्हाळ्याचे नाते होते. काही महिन्यापूर्वी ईश्वरपूर येथे एका कार्यक्रमात भेट झाली होती. व्यासपीठावर आमच्यामध्ये दोन चार मिनिटे चर्चा झाली. त्या कार्यक्रमात त्यांनी बोलताना १२ कोटी जनतेचा उल्लेख करत आणि मला कल्पना नसलेले माझ्या विषयी ते कौतुकाने जाहीरपणे भरभरून बोलले. सर्वसामान्यांची कदर आणि ओळख असलेला हा नेता. सामान्य माणसाची कदर ओळखणारे, खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे ठामपणे सांगणारे असे नेतृत्व महाराष्ट्राने गमावल्याची आणि महाराष्ट्राचा दादा हरपल्याची भावुक प्रतिक्रिया लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केली.

**अजितदादांची कार्य अजोड - आमदार प्रशांत ठाकूर**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची ओळख कर्तव्यदक्ष आणि धडाडीचे नेते अशी होती. विमान अपघातात त्यांचे निधन झाले आणि त्यांच्या निधनाची बातमी सर्वांसाठी धक्कादायक पद्धतीचे वृत्त आहे. अजितदादांनी सदैव धडपडणाऱ्या, काम करणाऱ्या माणसाला आधार दिला आहे. विशेषत्वाने रायगड जिल्ह्यावर त्यांचे प्रेम होते. रायगड जिल्ह्यातील अनेक विकासकामांना त्यांनी पाठबळ दिले. ते पाहता संपूर्ण जिल्ह्यातला प्रत्येक राजकीय व सामाजिक कार्यकर्ता आज हळहळत आहे. अजितदादांच्या निधनाचे आज हे वृत्त ऐकल्यानंतर अनेकांना शोक अनावर झाला आहे. त्यांच्याशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला दुःख झाला आहे आणि यातून त्यांना सावरणे कठीण आहे. अजितदादांनी केलेले कार्य अजोड आहे.

# अतिदुर्गम गडबवाडीत घरफोडी; सोने व रोख रक्कम लंपास

## महिला व वृद्धांची वस्ती असलेल्या भागात चोरट्यांचा धुमाकूळ

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुक्यातील अतिदुर्गम गडबवाडी परिसरात घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या भागातील अनेक कुटुंबे रोजगाराच्या निमित्ताने मुंबईत वास्तव्यास असून गावात प्रामुख्याने महिला व वृद्ध नागरिकच राहत आहेत. याच परिस्थितीचा गैरफायदा घेत चोरट्यांकडून बंद घरांना लक्ष्य केले जात असल्याचे दिसून येत आहे.

काही दिवसांपूर्वी केळेवाडी गावात घरफोडीचा अयशस्वी प्रयत्न झाल्यानंतर आता गडबवाडी येथे प्रत्यक्ष घरफोडीची घटना उघडकीस आली आहे.

रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळच्या सुमारास गडबवाडी येथील श्री. भागडे यांच्या घराचा दरवाजा तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. त्या वेळी सौ. भागडे या कामानिमित्त बाहेर गेल्या होत्या. घर रिकामे



असल्याची संधी साधत चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून महिला व वृद्ध नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. याप्रकरणी श्रीवर्धन पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.दरम्यान, अतिदुर्गम व दुर्गम भागात नियमित पोलिस गस्त वाढवावी तसेच घरफोडी करणाऱ्या टोळीचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी गडबवाडी व परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ब्रम्हांड सेवा संघ येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत(कल्याण ग्रामिण प्रतिनिधी)** : गोकुळदासवाडी विभागातील ब्रम्हांड सेवा संघ येथे दि.२६.०१.२०२६ रोजी भारताचा ७७ वा *प्रजासत्ताक दिन* अतिशय उत्साहात पार पडला. ब्रम्हांड सेवा संघाचे उपाध्यक्ष संतोष रत्नकांत खमितकर यांच्या हस्ते *ध्वजारोहण* करण्यात आले.यावेळी विद्यार्थी,परिसरातील नागरिक बहुसंख्येंने उपस्थित होते.

सदर प्रसंगी मा.परिवहन सदस्य राजेंद्र महाडिक,सिध्दीविनायक मंडळ अध्यक्ष अनिल साळुंके, समाजसेवक सचिन भोसले, समाजसेवक प्रकाश कदम, समाजसेवक प्रभाकर थोरात, कोकण प्रांत बजरंग दल सुरक्षा दल प्रमुख.दीपक मेढेकर, विभागप्रमुख राजू मोरे,



समाजसेवक समीर पेंढारे,समाजसेविका अरुणा पेंढारे,समाजसेवक विकास मेस्ता,दुर्गा वाहिनी कोकण प्रांत स्वाती भोसले,समाजसेवक धनंजय भोसले,

शाखाप्रमुख सत्यवान गावकर उपस्थित होते. तसेच हा सोहळा यशस्वी करण्या करिता अश्विनी दुबे, मधुरा भोसले,कविता किणी, जयश्री फुटाणे, किशोर किणी(सर) ,कुंदा गौड,भरत दुबे ,राजेश तिवारी,आकाश दुबे,मुन्ना दुबे,संतोष खमितकर, यांचे विशेष योगदान लाभले.

# जालना जिल्ह्यात जाफ्राबाद तालुक्यात जि,प, कें,प्रा,शाळेत प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी/ज्ञानेश्वर निकाळजे :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जालना जिल्ह्यात जाफ्राबाद तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा भारज बु येथे ध्वजारोहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. शालेय शिक्षण व्यवस्थापन समिती अध्यक्ष सन्माननीय श्री शरद रामचंद्र तेलंग्रे यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व परेडच्या माध्यमातून देशभक्तीचा जागर करण्यात आला. यावेळी शाळांतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य घुंगर काठी , लेझीम , डॅम्बेज मनोरा व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. यावेळी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ( शिक्षक ) श्री वाघ सर यांनी केले तसेच



यावेळी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

प्रजासत्ताक दिनाच्या या पावन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी देशाच्या एकता, अखंडता आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण करण्याचा संकल्प व्यक्त केला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ( मुख्याध्यापक) श्री राजकुमार खंडेलवाल सर , शालेय शिक्षण व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री शरद तेलंग्रे, वाघ सर , वायाळ सर, सरसांडे सर ,गिरी सर , वाघमारे सर, जंजाळ सर, मोहरुत सर, निंबाळकर सर,पेरे सर,सोनूने सर, नागपुरे सर,शेळके सर,पाटील मॅडम , वाघ मॅडम, मुळे सर ,सर्व निदेशक भुते सर, अमर सर,घोडके सर, सुनील निकाळजे , शरद म्हस्के, देवेंद्र दामधर, अन्वर भाई,गणेश काटकर , राम सुरडकर , शालिक तेलंग्रे , बंडू महाराज महानोर , शब्बीर मौलाना,आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# वधू वर परिचय मेळावा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : पनवेल उरण आगरी समाज मंडळ, पनवेल आयोजित २९ वा वधू वर परिचय मेळावा मंडळाच्या महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे उद्घाटन ज्येष्ठ कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.

मंडळाचे अध्यक्ष अतुल दि.बा. पाटील यांनी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या प्रतिमेस



पुष्पहार अर्पण केला. माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांनी यावेळी बहुमोल मार्गदर्शन केले. मेळाव्यामध्ये १९९ मुले व ९९ मुलींनी सहभाग घेतला. प्रत्येकी दहा मुले / मुलींना स्टेजवर बोलवून परिचय करून देण्यात येत होता.

सकाळी ११ वाजता सुरू झालेला कार्यक्रम सायंकाळी सहा वाजेपर्यंत मोठ्या उत्साहात चालू होता. अनेकांनी परस्परांना माहितीची देवाणघेवाण करित संपर्क साधला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष अतुल पाटील, उपाध्यक्ष जे.डी. तांडेल, सचिव बी.पी. म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय द. गायकर, मेघा तांडेल, मनीषा तांडेल, शिवदास पाटील, शिवदास कांबळे माजी नगरसेवक, जगदीश गायकर, माजी उपसरपंच संजय गायकर, डी. बी. पाटील ,विद्याधर पाटील यांनी बहुमोल सहकार्य केले.

# उल्हासनगर महापालिकेचा भोंगळ कारभार

**दैनिक युवक आधार**

**उल्हासनगर/रशीद शेख :** ज्ञानसूर्य, प्रज्ञावंत, संविधानाचे निर्माते, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा शांतीनगर, उल्हासनगर-3 येथील स्मशानभूमीत बसवला आहे. हा पुतळा तेथून हलवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय/अभ्यासिका, उल्हासनगर - 3 येथे स्थलांतरित करावा, या मागणीसाठी तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यासाठी श्री कालिका कला मंडळ, मराठा सेंक्शन उल्हासनगर -4 उल्हास विद्यालय जवळ, येथे रविवार दि. 1 फेब्रुवारी रोजी सायंकाळी ठिक पाच वाजता आयोजित केली आहे.

तरी सर्व पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते, आंबेडकरवादी संस्था- संघटना, पत्रकार, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यांनी वरील ठिकाणी वेळेवर उपस्थित राहावे.

शनिवार दि. 7 फेब्रुवारी रोजी सदर आंदोलन केले जाईल, त्याचे नियोजन करण्यासाठी प्रमुख नेते व कार्यकर्त्यांची ही मिटिंग घेण्यात येणार आहे तर सर्व भिम सैनिकानीं एक जुटिने येऊन आपले मत इच्छुकांनी दरशावे हि सर्व उल्हासनगर शहर रहिवाशांना कळकळीची विनंती आहे



## राष्ट्रीय चर्मकार संघाच्या धारावी तालुकाप्रमुखपदी दिलीप गाडेकर यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे/प्रतिनिधी) :** रौप्य महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या चर्मकार समाजातील लढाऊ राष्ट्रीय चर्मकार संघाच्या मुंबई धारावी तालुकाप्रमुखपदी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री दिलीप महादेव गाडेकर यांची दि.२६जाने २०२६ रोजी एका जाहीर कार्यक्रमात संस्थापक अध्यक्ष व लढाऊ नेतृत्व माजी आमदार श्री बाबुराव माने यांनी नियुक्ती केली.यावेळी मुंबई अध्यक्ष श्री विलास कोरेगावकर, प्रदेशाध्यक्ष श्री रामभाऊ कदम, पुणे जिल्हा महिला अध्यक्ष सौ मंगला गवळी,परशुराम इंगोले साहेब व खिल्लारे आदी समाज बांधव उपस्थित होते.यावेळी राष्ट्रीय चर्मकार संघाची दिनदर्शिका प्रकाशन व कार्यकर्त्यांचा मेळावा मनोहर जोशी विद्यालय धारावी या ठिकाणी आयोजित करण्यात आला. यावेळी मुंबई, नवी मुंबई सह इतर जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांना मा श्री बाबुराव माने साहेब यांच्यासह इतर वक्ते व नेत्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी श्री माने म्हणाले की संपूर्ण चर्मकार समाज या संघटनेच्या छताखाली एकत्र येऊन दलित



मागासवर्गीय चर्मकार यापैकी कुठल्याही घटकावर अन्याय अत्याचार झाल्यास कायदेशीर मार्गाने तुटून पडा न्याय मिळेपर्यंत संघर्ष करा.

ही संघटना घरोघरी गावोगावी खेड्यापाड्यात पोहोचवण्याची व आपल्या समाजातील घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी जबाबदारी आपण घेतली पाहिजे. आपण शासनकर्ती जमात होण्यासाठी संघर्ष व लढा उभारावा लागेल असे मार्गदर्शन केले. श्रीदिलीप गाडेकर यांची धारावी तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सर्वांनी कौतुक व अभिनंदन केले.

## संघर्षातून समाजप्रकाशाकडे राजेंद्र पाटील यांना 'उत्कृष्ट समाजसेवक' दादासाहेब फाळके पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/ उरण रायगड :** संघर्षाला शस्त्र, वेदनांना शक्ती आणि दिव्यांगत्वाला समाजपरिवर्तनाचे साधन बनवत ज्या व्यक्तीने आयुष्य समाजासाठी झोकून दिले, त्या राजेंद्र गजानन पाटील यांच्या सेवाभावी कार्याला दादासाहेब फाळके चित्रपट युनियनतर्फे "उत्कृष्ट समाजसेवक" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दादरपाडा (उरण) येथील रहिवासी व दिव्यांग सामाजिक संघटना उरणचे उपाध्यक्ष तसेच आई फाउंडेशन चेही उपाध्यक्ष असलेले राजेंद्र पाटील यांचा हा सन्मान म्हणजे संपूर्ण दिव्यांग समाजाच्या जिद्दीचा गौरव मानला जात आहे.

राजेंद्र पाटील यांनी दिव्यांगत्वाला कधीही मर्यादा मानले नाही. उलट त्यालाच ताकद बनवत त्यांनी असंख्य दिव्यांग बांधवांच्या आयुष्यात



स्वाभिमानाची ज्योत पेटवली. त्यांच्या दुःखाला स्वतःचे दुःख समजून त्यांनी त्यांच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवला. स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखवत त्यांनी हजारो कुटुंबांमध्ये आशा आणि विश्वास निर्माण केला.

त्यांचे कार्य केवळ दिव्यांग बांधवांपुरते मर्यादित न राहता आदिवासी पाड्यांवरील वंचित घटक, ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न आणि समाजातील प्रत्येक दुर्लक्षित व्यक्तीपर्यंत पोहोचले. निःस्वार्थ वृत्तीने केलेल्या या कार्याबद्दल यापूर्वीही द्रोणागिरी भूषण पुरस्कार – २०२४, ग्रामीण विकास कार्यकर्ता, दिव्यांग दूत असे विविध सन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत.

"हा पुरस्कार माझा एकट्याचा नसून उरण तालुक्यातील प्रत्येक दिव्यांग बांधवाचा आहे," असे भावनिक उद्गार राजेंद्र पाटील यांनी पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केले. आपल्या यशामागे कुटुंबीयांचा आधार, दिव्यांग सामाजिक संघटनेचे शिलेदार, आई फाउंडेशन चे सर्व सदस्य आणि मित्रपरिवार यांचे सहकार्य असल्याचे त्यांनी नमूद केले. "यापुढेही माझी सामाजिक बांधिलकी जपत समाजसेवा अखंड सुरू ठेवणार," असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

दि. २५ जानेवारी २०२६ रोजी रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी (मुंबई) येथे आयोजित सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सुप्रसिद्ध अभिनेत्री वर्षा धांदळे यांच्या हस्ते राजेंद्र पाटील यांचा गौरव करण्यात आला. यावेळी श्री. संतोष शिवदास आमले (अध्यक्ष, दादासाहेब फाळके चित्रपट युनियन – महाराष्ट्र राज्य) उपस्थित होते.हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून माणुसकी, जिद्द आणि निस्वार्थ सेवेचा विजय आहे. राजेंद्र पाटील यांच्या कार्यामुळे समाज बदलू शकतो, याची जिवंत साक्ष या पुरस्कारातून अधोरेखित झाली आहे.

## कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीच्या शैक्षणिक संस्थांमध्ये पनवेल शहर वाहतूक शाखेकडून रस्ता सुरक्षा अभियान २०२६ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी अंतर्गत कार्यरत बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, पनवेल तसेच बार्न्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, पनवेल येथे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, वाहतूक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला पनवेल वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने तसेच राष्ट्रीय पुरस्कार विजेते कवी मोहन काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमा दरम्यान औदुंबर पाटील यांनी



हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, वेगमर्यादेचे पालन, वाहन चालविताना मोबाईल वापर टाळणे तसेच मद्यप्राशन करून वाहन न चालवण्याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे होणाऱ्या अपघातांची उदाहरणे देत नियम पाळण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

राष्ट्रीय पुरस्कार विजेते कवी मोहन काळे यांनी रस्ता सुरक्षेवर आधारित प्रभावी कविता सादर करून उपस्थितांना सामाजिक संदेश दिला. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील व कवी मोहन काळे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय व हायस्कूल मधील विद्यार्थ्यांना वाचनासाठी कविता व विज्ञान विषयक एकूण ३५ पुस्तके भेट स्वरूपात देण्यात आली. तसेच पनवेल वाहतूक शाखेकडून वाहतूक जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेली नियमावलीची कार्डे प्रत्येक विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली. या कार्यक्रमाचे नियोजन कॉलेज व पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार अमीर मुलाणी, युवराज येळे, विश्वनाथ पाटील, महेंद्र गळवी, योगिता पाटील व संजय घाडगे यांनी केले.

बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स येथे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत पाटील यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. के. के. भोईर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी एनएसएस विभाग प्रमुख प्रा. चंद्रकांत मुकादम यांनी आभार मानले.


## कोप्रोली जिल्हा परिषद शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन देशभक्तीच्या उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड :** संपूर्ण देशभर २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा होत असताना, कोप्रोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत हा राष्ट्रीय उत्सव अत्यंत मंगलमय व देशभक्तीपूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी भव्य प्रभात फेरीने झाली. ढोल-ताशा व लेझीमच्या गजरात विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी "वंदे मातरम्", "भारत माता की जय", "प्रजासत्ताक दिनाचा विजय असो" अशा देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. प्रभात फेरी नंतर हुतात्मा स्मारक, गावातील सार्वजनिक तळे, कोप्रोली ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय त्यानंतर जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम पार पडला.

ध्वजारोहण प्रसंगी विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत "जन गण मन", राज्यगीत "जय जय महाराष्ट्र माझा", तसेच "विजयी विश्व तिरंगा प्यारा" सादर करून वातावरण देशभक्तीने भारावून टाकले. शाळेच्या मुख्याध्यापिका मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण गावाने साक्षरता शपथ घेतली. यावेळी कोप्रोली ग्रामस्थांनी गाव शंभर टक्के साक्षर करण्याचा निर्धार व्यक्त केला. यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर आकर्षक कवायती सादर केल्या. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सादरीकरणामुळे उपस्थित ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले. देशभक्तीपर गीतांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले. कार्यक्रमाचा शेवट विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून आनंदोत्सवात करण्यात आला.सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षकवृंद, संपूर्ण शाळा व्यवस्थापन समिती तसेच गावातील शिक्षणप्रेमी नागरिक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले. तसेच उदात्त भावनेतून विद्यार्थ्यांसाठी खाऊ वाटप करणाऱ्या सर्व दात्यांचेही विशेष आभार व्यक्त करण्यात आले.



## भारज बु येथील ( पत्रकार)राजेश दामधर यांना दुसऱ्यांदा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी/ज्ञानेश्वर निकाळजे :** जालना जिल्हातील जाफ्राबाद तालुक्यातील भारज बु येथील रहिवाशी असलेले सामान्य कुंटूबातील राजकीय सामाजिक कार्यकर्ता श्रीमान राजेश दौलतराव दामधर यांना वाशिम जिल्हातील कारंजा [लाड ] येथील वैदर्भीयनाथ चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज समाज भुषण पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे. राजेश दामधर हे गेल्या पस्तीस वर्षापासून पत्रकारिता करित असल्यामुळे त्यांनानागपूर येथील मदत फाऊंडेशनने डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकार या राज्यस्तरीय पुरस्काराने पहिल्यांदा सन्मानित केलेले आहे. राजेश दामधर हे गेल्या तीस ते पस्तीस वर्षापासून सामाजिक आणि राजकिय कार्यकर्ते आहे.त्यांच्या कामाची दखल घेऊन कारंज्या येथील वैदर्भीयनाथ चॅरीटेबल ट्रस्टने दखल घेऊन यांना दुसऱ्यांनदा राज्यस्तरीय पुरस्कार हा सन्मान कर्तृत्वाचा, सोहळा कौतुकाचा या कार्यक्रम घेऊन कारंज्या विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आमदार सन्माननीय सौ सईताई प्रकाश दादा डहाके, वैदर्भीयनाथ चैरीटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा आदरणीय सौ. पूनमताई एकनाथजी



पवार सचिव माननीय श्री एकनाथजी पवार , डॉ. श्री पंकजजी काटोले, श्री दिलीपजी रोकडे मोठ्या मनाचा, दिलदार, निस्वार्थी राजा माणूस, निष्कलंक, चारित्र्य संपन्न चिखली अर्बन बँकेचे शाखा व्यवस्थापक श्री रविंद्रजी जाधव तसेच समाजसेविका सौ. शारदाताई भुयार, सौ. आशाताई मेश्राम यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला आहे. या ट्रस्टने करित असलेल्या कामाची नोंद घेऊन पुस्कार दिल्याने राजेशदामधर यांना आनंद व्यक्त केला आहे. सामाजिक चळवळतील आणि केलेल्या त्यागाची दखल घेतल्याने राजेश दामधर पुढील कामासाठी उत्तेजना मिळाली असून ते यापुढेही उत्सपुर्तपणे कार्य करणार असल्याचे कळते हा पुरस्कार मिळाल्याने त्यांचे भारज व परिसरात कौतुक आणि सत्कार करण्यात येत आहे.

## निवळी ग्रामपंचायत व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शांती निकेतन प्राथमिक शाळा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहाने साजरा करण्यात आला

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी/चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर :** भारतीय प्रजासत्ताक दिवस हा भारताच्या प्रजासत्ताकात दरवर्षी २६ जानेवारी रोजी पाळला जाणारा राष्ट्रीय दिन आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारताचे संविधान समितीने २६ नोव्हेंबर, इ.स. १९४९ रोजी स्वीकारले व २६ जानेवारी इ.स. १९५० रोजी पासून भारतीय संविधान अंमलात आले. जवाहरलाल नेहरू यांनी ३१ डिसेंबर, इ.स. १९२९ रोजी लाहोरजवळ रावी नदीच्या काठी अशोक चक्रांकित तिरंगा ध्वज फडकावून पूर्ण प्रजासत्ताकाची स्वातंत्र्याची घोषणा केली होती. त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला.

या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना दिली जाते.भारताचे राष्ट्रगीत म्हणले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती

नांदेड मुखेड तालुक्यातील निवळी



ग्रामपंचायत व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निवळी येथील भाषणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे

शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर पाटील दापकेकर सर शिक्षिका राठोड मॅडम यांच्या माध्यमातून निवळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महाराष्ट्र शासन महा वाचन उत्सव 2026

निवळी ग्रामपंचायत वतीने व कालकत्त राधाबाई चांदोबा जोंधळे यांच्या पुण्यस्मरणा निमित्त यांनी विद्यार्थ्यांचे भाषण व त्याची गुणवत्ता पाहून वही व पेना वाटप केले असून ग्रामपंचायत निवळी सरपंच शिवसमप्पा मठपती व उपसरपंच संभाजी पाटील माळेगाव ग्रामसेवक मंदेवाड बाशेटवाडीकर,सोसायटी चेअरमन भास्कर पाटील नेवळे ,संदिप पाटील नेवळे ,मारोती पाटील काटेवाडे ,राजू पाटील सुर्यवंशी गणेश पाटील मादलापुरे,पोलिस पाटील निवळी ,तिरुपती पपुलवाड ,शिवाजी पाटील नेवळे राहूल पाटील माळेगावे ,रमेश दहिकाबळे ,कैलास दहिकाबळे,KM दहिकाबळे ,अंगणवाडी सेविका व सर्व मदतनीस आशा वर्कर ,ग्रामपंचायत सर्व सदस्य व सर्व सेवक पत्रकार पपु वाघमारे निवळीकर उपस्थित सर्व गावकर प्रतिष्ठित उपस्थित होते

## पत्नीच्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी पती सरसावला

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** सौ.माधुरी सागर भिसे या जिल्हा परिषद निवडणुकीच्या उमेदवारीसाठी सामाजिक व सार्वजनिक जीवनातील कार्याला बळ देण्यासाठी श्री.सागर बाळासाहेब भिसे हे स्वतः पुढे येतआहे हे दृश्य समाजात क्वचित पाहायला मिळते अशी प्रेरणादायी भूमिका श्री. सागर बाळासाहेब भिसे हे सध्या पार पाडत आहेत पत्नीच्या प्रचारासाठी त्या उत्साहाने आणि जबाबदारीने काम करीत असून मतदारामध्ये त्यांचे विशेष कौतुक केले जात आहे सौभाग्यवती माधुरी सागर भिसे यांनी प्रचारादरम्यान घरोघरी भेटी देत मतदारासोबत संवाद साधत आहेत तसेच जिल्हा परिषद गटातील कामाचा आढावा घेत त्यांच्या विकासात्मक दृष्टकोन यांची माहिती त्या मतदारापर्यंत पोहोचवत आहेत तरुण युवक,महिला जेष्ठ नागरिकांशी थेट संवाद साधुन त्यांनी सकारात्मक वातावरण निर्माण केले असल्याचे जाणवत आहे त्यांचा हा सहभाग केवळ कौंटुबिक कर्तव्यापुरताच मर्यादित न राहता सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारी ठरत



आहे माझ्या पत्नीच्या माध्यमातून पुढील काळात नेहमीच नागरिकांसाठी कामे केली जाणारअसल्याची माहिती सागर भिसे देत आहेत सौ माधुरी भिसे यांच्या कार्याला जनतेचा पाठिंबा मिळावा हिचं माझी इच्छा आहे असे मत पती श्री सागर भिसे यांनी पत्नी सौभाग्यवती माधुरी भिसे यांच्या प्रचारावेळी व्यक्त केले त्यांच्या या कार्यामुळे प्रचाराला नवी ऊर्जा मिळत असून तरूण पिढीने सामाजिक व लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा असा संदेश ही पती श्री. सागर बाळासाहेब भिसे यांनी यावेळी सांगितले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# शुभम मगर यांच्या कसम परेडला आई-वडिलांची व भावांची अभिमानास्पद हजेरी

**दैनिक युवक आधार**

**देऊळगाव घाट (आदिनाथ ठोंबरे) :** देऊळगाव घाट हे बीड जिल्ह्यातील एक सैनिकांचे गाव म्हणून ओळखले जाते. या छोट्याशा गावातून देशसेवेसाठी उभा राहिलेला वीर सुपुत्र म्हणजे शुभम मगर. केंद्रीय राखीव दलाचे कठोर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून शुभम मगर आज देशरक्षणासाठी सज्ज झाले आहेत.

देशसेवेचा मार्ग हा त्याग, शिस्त आणि निस्वार्थ प्रेमाने भरलेला असतो. हाच मार्ग निवडत शुभम मगर यांनी केंद्रीय राखीव दल (CRPF) च्या कसम परेडमध्ये सहभाग घेतला. केरळ राज्यातील पैयनूर येथे असलेल्या राष्ट्रीय रेजिमेंट युनिव्हर्सिटीमध्ये ही कसम परेड पार पडली. या परेडच्या निमित्ताने शुभम यांनी आपल्या आयुष्यातील एक अविस्मरणीय सुवर्णक्षण अनुभवले.

कसम परेडच्या मैदानात केवळ गणवेशातील जवानच उभे नव्हते, तर त्यांच्या मागे उभा होता आई-वडिलांचा अथांग त्याग, संस्कारांची शिदोरी आणि अपार प्रेम. शुभम यांच्या कसम परेडला त्यांच्या आई-वडिलांनी तसेच भावांनी आवर्जून उपस्थिती लावली. हा क्षण केवळ एका जवानाचा नव्हता, तर संपूर्ण कुटुंबाच्या स्वप्नपूर्तीचा साक्षीदार ठरला.

आईच्या डोळ्यांत अभिमानाचे अश्रू होते, तर वडिलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे तेज झळकत होते. लहानपणी हात धरून चालायला शिकवलेला मुलगा आज देशाच्या रक्षणासाठी शपथ घेताना पाहणे, यापेक्षा मोठा सन्मान आई-



वडिलांसाठी दुसरा कोणता असू शकतो?

तो क्षण शब्दांत मांडता येणार नाही असा होता—तो केवळ हृदयाने अनुभवण्याचा होता.

केंद्रीय राखीव दलाची कसम ही केवळ औपचारिकता नसून, ती देशावरच्या अढळ प्रेमाची, कर्तव्यनिष्ठेची आणि बलिदानाची शपथ असते. शुभम मगर यांनी घेतलेली ही शपथ म्हणजे भारतमातेच्या चरणी अर्पण केलेले एक निःस्वार्थ वचन आहे.

या कसम परेडमध्ये आई-वडील व भावांची उपस्थिती ही शुभम यांच्या आयुष्यातील सर्वात मोठी प्रेरणा ठरली. कारण प्रत्येक सैनिकामागे उभे असलेले कुटुंबच त्याला प्रत्येक कठीण प्रसंगी पुढे जाण्याची ताकद देते.

शुभम मगर यांचे हे यश केवळ वैयक्तिक नसून, ते प्रत्येक त्या पालकांचे आहे, जे आपल्या लेकराला देशसेवेसाठी घडवतात.अशाच क्षणांतून देशभक्तीचा खरा अर्थ उलगडतो—प्रेम, त्याग आणि अभिमान यांचा सुंदर संगम.

# तळा इंग्लिश स्कूल तळाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या तळा इंग्लिश स्कूल तळा, (पूर्वाश्रमीचे) इयत्ता १० वी अ आणि ब शैक्षणिक वर्ष १९९५-९६ मधील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन श्री गो. म.वेदक विद्यामंदिर, तळा येथे नुकतेच पार पडले. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के, अध्यक्ष मंगेश देशमुख कार्यकारी मंडळाचे सदस्य महादेव बैकर, भद्रेश पटेल संस्था सदस्य चंद्रकांत खातू, भागवत मॅडम, मुतंगे सर, भौड सर, जामकर सर, कांबळे मॅडम, मुतंगे मॅडम, काळबेरे मॅडम, उर्दू हायस्कूल तळाचे पदाधिकारी महंमद परदेशी आदि मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीला माजी विद्यार्थ्यांकडून संस्थेचे विद्यमान पदाधिकारी आणि तत्कालीन शिक्षक यांची फुलांच्या वर्षावात व फटाक्यांच्या आतषबाजीने मुख्य प्रवेशद्वार ते कार्यक्रम स्थळ या ठिकाणी मिरवणूक काढण्यात आली. तत्कालीन मुख्याध्यापक मुतुंगे सर यांनी जुन्या आठवणी जागृत करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना वर्गामध्ये प्रवेश देत असताना हातावर आपुलकीच्या



छडीचा मार दिला.सन १९९५-९६ या वर्गातील काही विद्यार्थी मागील तीस वर्षांमध्ये निधन पावले आहेत तसेच ही शिक्षण संस्था उभारण्यात ज्या ज्या महनीय व्यक्तींचे अमूल्य असे योगदान आहे त्यांचे स्मरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी श्री प्रकाश गायकवाड यांनी केले. यामध्ये त्यांनी आपल्या तीस वर्षांपूर्वीच्या शाळेच्या जीवनातील आठवणींना उजाळा दिला. यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपापली ओळख करून दिली. यावेळी विद्यमान मुख्याध्यापक श्री. ढाकणे सर यांनी प्रत्येक माजी विद्यार्थ्यास कॅडबरी देऊन त्यांच्या कार्यक्रमातील गोडी वाढवली. माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते सर्व संस्था पदाधिकारी, सर्व गुरूंचा सन्मान केला. तसेच मान्यवरांच्या हस्ते माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी निवडक १० ते १२ माजी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यामध्ये त्यांनी आपल्या शालेय जीवनातील अनेक गोष्टी उलगडल्या. आज आम्ही काही प्रमाणात यशस्वी आहोत ते केवळ या शाळेमुळेच. शाळेने आम्हाला त्यावेळी जी काही ज्ञानाची शिदोरी दिली आहे ती आम्हाला संपूर्ण जीवन जगण्यासाठी नेहमीच प्रेरणा देत राहील अशा भावना व्यक्त केल्या. आम्ही त्यावेळी शिक्षण आणि संस्कार दिलेले विद्यार्थी आज आमचा येथे यथोचित सन्मान करत आहेत हे पाहून आम्ही सगळे भारावून गेलो आहोत अशा भावना तत्कालीन शिक्षकांनी व्यक्त केल्या. यानंतर संस्था विश्वस्त मारुती शिर्के गुरुजी, सदस्य श्री महादेव बैकर, श्री. महम्मद परदेशी यांनी माजी विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन केले. तसेच अध्यक्ष श्री. मंगेश देशमुख यांनी संस्थेच्या प्रगतीचा आलेख मागील ३० वर्षात कसा उंचावत गेला याची माहिती दिली. कार्यक्रमाचा समारोप जन-गन-मन या राष्ट्रगीताने करण्यात आला. यावेळी शाळेच्या रंगमंचावर विद्यार्थ्यांनी संगीत खुर्ची तसेच गरबा नृत्य व विविध प्रकारचे नृत्य सादर करत आपला आनंद लुटला. प्रामुख्याने हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुंबई येथून हेमंत मालोरे, मनोहर धाडवे, नामदेव चोरगे, योगेश कुरपाणे, निलिमा घरटकर, विटा पारधी, कमल मंचेकर तसेच तळा या स्थानिक ठिकाणी मनोहर शिंदे, रवींद्र साठे, सुरेश जाधव, योगेश शिर्के, प्रकाश गायकवाड, छाया शिगवण, नंदिनी चिले, पुष्पा बैकर, लहू चव्हाण, जयेश गोळे आदींनी परिश्रम घेतले. या संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन प्रकाश गायकवाड आणि कमल मंचेकर यांनी केले तर आभार जगदीश कासे यांनी मानले.

# नेरे जिल्हा परिषद गणामधून सख्या भावांमध्ये लढत

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका 5 फेब्रुवारी रोजी होत आहेत. पनवेल तालुक्यातील नेरे जिल्हा परिषद गणा मधून शेतकरी कामगार पक्ष आणि भाजपमध्ये मुख्य लढत होताना दिसत आहे. या ठिकाणी दोन सख्खे भाऊ एकमेकांविरोधात लढत आहेत. मारुती बाळू भस्मा हे शेतकरी कामगार पक्षाकडून तर आत्माराम बाळू भस्मा हे भारतीय जनता पार्टी कडून जिल्हा परिषदेची निवडणूक लढवत आहेत. सख्ख्या भावांच्या या लढतीकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

पनवेल मध्ये विविध पक्षांनी 21 जानेवारी रोजी आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. पनवेल मध्ये



साऱ्यांचे लक्ष लागलेली लढत म्हणजे सख्खे भाऊ एकमेकांविरोधात उभे राहिलेले आहेत. शेतकरी कामगार पक्षाचे मारुती भस्मा हे यापूर्वी जिल्हा परिषदेचे सदस्य होते. तसेच पनवेल पंचायत समितीचे सभापती देखील होते. ते पुन्हा एकदा या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. मात्र त्यांच्यासमोर त्यांचा



सख्खा लहान भाऊ भाजपकडून निवडणूक लढवत आहे. ग्रामीण भागात शेतकरी कामगार पक्षाचे प्राबल्य आहे. मात्र 2004 नंतर रामशेठ ठाकूर आणि प्रशांत ठाकूर यांची जादू ग्रामीण भागात चालायला लागली.

त्यानंतर पुलाखालून बरेच पाणी गेले. भारतीय जनता पार्टी देखील तालुक्यात मजबूत होताना दिसत आहे. त्यामुळे ही लढत प्रेक्षणीय होणार आहे. या जिल्हा परिषद गणातून सख्खे भाऊ एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत.

आदिवासी आरक्षण पडलेल्या या जिल्हा परिषद गणामध्ये भाजपकडून गणपत वारगडा निवडणूक लढवण्यास इच्छुक होते. मात्र त्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी आणि त्यांची पत्नी उषा वारगडा यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. 27 जानेवारी रोजी गणपत वारगडा आणि उषा वारगडा यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले.

त्यामुळे नेरे जिल्हा परिषद मतदार संघात दोन सख्या भावांमध्ये लढत पहावयास मिळणार आहे

# प्रशासनावर पकड असलेले अजितदादांच्या जाण्याने इंदापूर तालुक्याला मोठा धक्का :- सरपंच यशवंत पाटील

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** लाख मेले तरी चालतील,पण लाखांचा पोशिंदा वाचला पाहिजे, असं बाजीप्रभू देशपांडे म्हणाले होते. आज अजितदादांच्याजाण्याने या ओळींची प्रकर्षाने जाणीव होत आहे. एक कर्ता पुरुष गेला की सगळी समीकरणं कशी बदलून जातात,याचा अनुभव आज महाराष्ट्र घेतोय, अशा शब्दांत सणसर गावचे सरपंच यशवंत पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.अजितदादांच्या निधनानंतर संपूर्ण राजकीय क्षेत्रावर शोककळा पसरली असून यशवंत पाटील यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दादांसोबतच्या सडेतोड बोलणारा नेता म्हणून आठवणींना दिला उजाळा अत्यंत स्पष्टवक्ता म्हणून दादांची ओळख होती. आपल्या चूक लक्षात आल्यावर ती मान्य करून 'सॉरी' म्हणण्याचं मोठं मनही अजितदादांच्यात होत त्यांच्या कार्यशैलीचे वर्णन करताना म्हटले की असा नेता मिळणं दुर्मिळ आहे. राजकीय मतभेद बाजूला ठेवून प्रशासनावर असलेली



पकड आणि कामाचा उरक यासाठी अजितदादा ओळखले जात. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक 'पॉवरहाऊस' हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. "Life is so uncertain... निःशब्द!" अशा शब्दांत सणसरचे सरपंच यशवंत पाटील यांनी आपल्या मनातील दुःख व्यक्त केले आहे.

# दादा मी तुम्हाला कधीच विसरणार नाही

आज सकाळी ८ वाजता मॉर्निंग वॉकला विक्रोळी कन्नमवार नगरातील धर्मवीर संभाजी महाराज मैदानात गेलो. आणि मोबाईल उघडला तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला अपघात. अजित दादा जखमी ही बातमी बघितली.मला वाटल दवाखान्यात असतील.पण घरी गेलो आणि टि.व्ही लावला तर ब्रेकींग न्युज दादा गेले. हे पाहून माझ्या पायाखालची वाळू सरकली.या बातमीवर विश्वास बसत नव्हता.मित्रांचे फोन दणाणले.मी नेहमी प्रमाणे मंत्रालयाची वाट धरली.ट्रेन मध्ये बसलो.आणि दादांच्या आठवणी समोरून दरवळून गेल्या.माझ्या सार्वजनिक जीवनात शरदचंद्र पवार, विलासराव देशमुख,अजितदादा पवार हे नेते माझे आवडते नेते होय.पवार काका पुतणे हे पुणे जिल्ह्याचे असल्यामुळे व मी पुणे जिल्ह्यातील जुन्नरचा रहिवाशी असल्यामुळे या दोघांचा मला नेहमी अभिमान वाटला आहे. पत्रकार क्षेत्रात आल्यानंतर या दोघांचा माझा नेहमीच संबंध आला.दादांचा सडेतोड स्वभाव,स्पष्टवक्तेपणा,एखादाच काम होणार नसेल तर तुझे काम माझ्याकडून होणार नाही. हे सांगण्याची हिम्मत मला नेहमीच आवडत असे.मी लहानपणापासून दादांना पाहत आलो आहे.दादा प्रथम खासदार झाले तेव्हा मी तरुण होतो.पुणे



जिल्ह्यातील ऊरळी कांचन येथे माझ्या बहिणीचे शिर्के हॉस्पिटल आहे तेथे मी नेहमी जात असे तेव्हा त्यांची सडेतोड भाषणे मी ऐकली आहेत.त्यानंतर विविध खात्याचे मंत्री,उपमुख्यमंत्री असताना ते नेहमी शिवनेरी किल्ल्यावर शिवजयंती उपस्थित असत.त्यानंतर ते जुन्नर शहरात जाहीर मिटींग घ्यायचे तेव्हा भाषणात उभे राहिल्यानंतर ते आजी,माजी,पंचायत, जिल्हापरिषद अध्यक्ष, सभापती यांच्यासह निष्ठावंत कार्यकर्त्यांची नावे वाचून न दाखवता बोलून दाखवायचे. एवढी त्यांची कार्यकर्त्यांची त्यांची नाळ जुळली होती. मला आठवतय २०११ साली माझे सासरे जुन्नरचे आमदार वल्लभशेठ दत्तात्रय बेनके यांच्याकडे मला दलित मित्र पुरस्कार हवा यासाठी गेलो असता ते म्हणाले तू तर मराठा आहेस ना,तुला कश्याला पाहिजे.पण माझ्याकडे पाहून ते म्हणाले,दादांना सांगतो.आणि त्यांनी मला दोन लेटरहेड दिले. आणि त्यावर तूला काय पाहिजे ते लिह असे सांगितले.मी एक पत्र दादांना तर दुसरे तत्कालीन सामाजिक न्याय राज्यमंत्री सचिन अहिर यांना दिले.अहिर यांच्याकडे गेलो असता अरे दोन दिवसानंतर पुरस्कार सोहळा आहे.तू अर्ज केला का असे विचारले.मी नाही म्हणालो. जा बघतो असे ते म्हणाले. त्यानंतर तत्कालीन मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी त्यांच्या एका कार्यकर्त्यांची शिफारस अहिर यांच्याकडे केली.परंतू दादा व अहिर यांनी माझे सासरे आमदार वल्लभशेठ दत्तात्रय बेनके यांचे एकले.माझा अर्ज नसताना देखील मला हा पुरस्कार देण्यात आला. यावर्षीपासून दलित पुरस्काराचे नाव बदलून डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार हे नामकरण झाले.माझे शासन जी आर मध्ये पहिले नाव आले. त्यानंतर मी सामाजिक न्याय खात्याकडे माझा अर्ज दाखल केला.अशी दादांची काम करण्याची पद्धत होती. दादांकडे मला डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण मिळाला. मी त्यांचा वल्लभशेठ दत्तात्रय बेनके यांचा रूणी आहे.दादांचा वाढदिवसानिमित्त मी मासिक जाग मराठा च्या वतीने विशेषांक काढला होता.त्यावेळी त्यांचे जनसंपर्क अधिकारी संजय देशमुख यांनी मला लेख देऊन सहकार्य केले होते.त्यावेळी दादांना अंक आवडला होता. देशमुख यांचे चार महिन्यापूर्वीच हृदयविकाराने निधन झाले. त्यावेळीची घटना सुध्दा मनाला चटका लावून गेली दरवर्षी नागपूर हिवाळी अधिवेशनात पत्रकारांच्या सुयोग या निवासस्थानी दादा येत असायचे आणि अनौपचारिक गप्पांमधून बातमी द्यायचे.आता या गप्पा होणार नाहीत.दादा तुम्ही दिलेला सहवास नेहमीच लक्षात राहील. तुमच्या जाण्याने आयुष्यातील पोकळी कधी भरुन निघणार नाही.दादा मी तुम्हांला कधीच विसरणार नाही.

**नासिकेत कृष्णकांत पानसरे**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्र शासन**

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार; राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित आशाताई अनंतराव पवार यांचे आज दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले आहे. यामुळे महाराष्ट्रात २८ ते ३० जानेवारी २०२६ या तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, असे सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

या तीन दिवसांच्या कालावधीत महाराष्ट्रातील ज्या इमारतींवर नियमितपणे राष्ट्रध्वज फडकविण्यात येतो, त्या सर्व ठिकाणी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येईल. तसेच या कालावधीत कोणतेही शासकीय मनोरंजन कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ नयेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालये बंद राहतील, असे कळविण्यात आले आहे.

# सोमवंशी क्षत्रिय पाठारे ज्ञाती समाज, उरण यांचा पारितोषिक वितरण व सत्कार समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उरण/सायली सालुंके :** सालाबादप्रमाणे सोमवंशी क्षत्रिय पाठारे ज्ञाती समाज, उरण यांचा पारितोषिक वितरण व सत्कार समारंभ रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ रोजी ज्ञाती समाजाच्या रामकृष्ण आत्माराम पाटील सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला.

यावर्षी विविध स्पर्धांमध्ये ज्ञाती समाजातील भगिनींचा लक्षणीय सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. सतिश पुरव (अध्यक्ष – शांती निवास, मुंबई) यांनी भूषविले. तर क्षात्रैक्य समाज, ठाणेचे विश्वस्त श्री. पंकज अशोक म्हात्रे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यमान अध्यक्ष श्री. रंजन अनंत काठे यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली. आपल्या भाषणात त्यांनी समाजाच्या गोसपाडा परिसरातील ताब्यात असलेल्या मात्र सध्या वापरात नसलेल्या चार गुंठे जागेचा उल्लेख करत, लवकरच त्या जागेचा उपयोग समाजोपयोगी उपक्रमांसाठी करण्यात येणार असल्याची घोषणा केली. त्यांच्या या निर्णयाचे उपस्थित समाजबांधवांनी स्वागत केले.

विशेष अतिथी श्री. पंकज अशोक म्हात्रे



यांनी आपल्या समयसूचक आणि प्रेरणादायी भाषणातून समाजाच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. सतिश पुरव यांनी अध्यक्षीय भाषणात उरण कार्यकारिणी तसेच उपस्थित समाजबांधवांच्या एकजुटीचे विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमास ग्रामपंचायत म्हातवलीच्या सरपंच श्रीमती रिना रुपेश शिरधनकर तसेच उपसरपंच श्रीमती निलिमा प्रदीप थळी यांनी आवर्जून उपस्थिती लावली. त्यांचा सो. क्ष. पा. ज्ञाती समाज, उरणच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांसह विविध स्पर्धांमधील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम थोडा लांबला असला तरी तो आटोपशीर व दिमाखदार झाला, असे उपस्थितांचे मत होते.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर उपस्थितांनी गरमागरम बासमती भात व चिकन रस्स्याचा आस्वाद घेतला.

# कालची दादांची आणि माझी शेवटची भेट - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक युवक आधार**

पायाभूत सुविधा समितीच्या मंत्रिमंडळ बैठकीसाठी मुख्यमंत्री मा. @Dev_Fadnavis जी यांच्यासमवेत आम्ही सर्व उपस्थित होतो. नेहमीप्रमाणे दादांचा आत्मविश्वास, मिश्कीलपण आणि कामावरील पकड तशीच होती. कोणालाही कल्पना नव्हती की ती भेट शेवटची ठरणार आहे. आजही दादांच्या नसण्याची कल्पना मनाला मान्य होत नाही.

क्षणोक्षणी वाटत राहते आता दादांचा फोन येईल, एखाद्या मुद्द्यावर ठाम शब्दांत चर्चा करतील, नेहमीसारखं हसत म्हणतील, "चला, कामाला लागूया."



**दादा...**आपली ही धक्कादायक एक्झिट आम्हाला मान्य नाही. महाराष्ट्राच्या विकासासाठी अखंड झटणारा, निर्णयक्षम नेतृत्वाचा आधार अचानक हरपल्याची पोकळी शब्दांत मांडता येणार नाही. तुमची आठवण नेहमी येईल, तुमची उणीव नेहमी जाणवत राहील.

# महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपमुख्यमंत्री अजित पवारांना श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग :** महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री, माझे ज्येष्ठ मित्र आदरणीय अजितदादा पवार यांच्या बारामती येथील विमान अपघातातील दुर्दैवी निधनाच्या बातमीने मी अक्षरशः हादरून गेलो आहे. मन सुन्न झाले आहे. या दुःखद बातमीवर अजूनही विश्वास बसत नाही.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला दिशा आणि गती देणारे लोकनेते म्हणून अजितदादांचे व्यक्तिमत्त्व कायम स्मरणात राहील.

प्रशासनावरची त्यांची मजबूत पकड, कामाचा अफाट वेग आणि लोककल्याणाचा अखंड ध्यास या साऱ्यांमुळे त्यांनी जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. अजितदादांचा प्रशासनातील अनुभव अतिशय समृद्ध होता. अनेकदा मी स्वतः त्यांच्याकडून सल्ला घेत असे, विविध विषयांवर त्यांच्याशी हक्काने चर्चा करीत असे. महायुतीत कार्य करत असताना अनेक प्रश्नांवर मोकळेपणाने संवाद साधण्याची त्यांची शैली मला नेहमी प्रेरणा देणारी वाटली. त्यांच्या सहवासातून मी स्वतः अनेक गोष्टी शिकलो.

अजितदादांचे जाणे हे केवळ एका नेत्याचे जाणे नाही; ते महाराष्ट्रावर कोसळलेले एक मोठे संकट आहे. देशाने एक दूरदृष्टीसंपन्न नेता गमावला आहे आणि मी माझा एक जिवलग ज्येष्ठ मित्र! अजितदादा आता आपल्यात नाहीत ही जाणीव अजूनही मनाला स्वीकारता येत नाही.

# महाराष्ट्राचा 'दादा' काळाच्या पडद्याआड : धर्माबाद शहरासह राज्यभरात शोककळा

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी/गिरमाजी सुर्यकार :** महाराष्ट्राच्या राजकारणातील कणखर, आक्रमक आणि निर्णयक्षम नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. राजकारणातील 'दादा' हरपल्याची भावना व्यक्त होत असून, धर्माबाद शहरासह राज्यभरात शोकमय वातावरण निर्माण झाले आहे.

अजित पवार हे केवळ एक राजकीय नेते नव्हते, तर अनेक कार्यकर्त्यांसाठी ते मार्गदर्शक, आधारस्तंभ आणि प्रेरणास्थान होते. त्यांच्या ठाम भूमिकांमुळे, थेट बोलण्याच्या शैलीमुळे आणि "काम बोलते" या तत्त्वामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. त्यांच्या अचानक जाण्याने राज्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

धर्माबाद शहरात त्यांच्या निधनाची बातमी समजताच नागरिकांनी हळहळ व्यक्त केली. विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक संघटना आणि सर्वसामान्य नागरिकांनी श्रद्धांजली अर्पण केली. अनेक ठिकाणी शोकसभा घेण्यात आल्या, तर काही ठिकाणी कडकडीत बंद पाळून शोक व्यक्त करण्यात आला.

बारामतीचा बालेकिल्ला सांभाळत राज्याच्या राजकारणात दबदबा निर्माण करणाऱ्या अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, जलसंपदा मंत्री अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. विकासकामांवरील पकड, प्रशासनावरची मजबूत पकड आणि कठोर निर्णयक्षमतेमुळे ते ओळखले जात होते. सिंचन, रस्ते, शेती आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय आजही स्मरणात राहतील.

त्यांच्या राजकीय वाटचालीत वादही आले, आरोपही झाले; मात्र प्रत्येक संकटातून ते अधिक ताकदीने उभे राहिले. समर्थकांसाठी ते विकासपुरुष होते, तर विरोधकांसाठीही ते दुर्लक्ष करता न येणारे राजकीय नेतृत्व होते.

अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक प्रभावी नेता गमावला असून, धर्माबाद शहरासह संपूर्ण राज्यातून शोकभावना व्यक्त होत आहेत. राजकीय 'दादा'च्या जाण्याने निर्माण झालेली ही पोकळी भरून न निघणारी असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

**राजकीय प्रवासाची सुरुवात**

अजित पवार यांनी राजकारणात प्रवेश सहकार चळवळ आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधून केला. सुरुवातीपासूनच ते संघटन कौशल्य, निर्णयक्षमता आणि आक्रमक नेतृत्वासाठी ओळखले गेले.

१९९१: बारामती लोकसभा मतदारसंघातून पहिली निवडणूक लढवली (पराभव)

१९९५: बारामती विधानसभा मतदारसंघातून प्रथमच आमदार म्हणून निवड

**विधानसभा व मंत्रिपदाचा प्रवास**

आमदार म्हणून १९९५ पासून सलग अनेक वेळा बारामतीचे आमदार

बारामती हा त्यांचा बालेकिल्ला मानला जातो

**मंत्री म्हणून** १९९९: महाराष्ट्र सरकारमध्ये प्रथमच मंत्री

जलसंपदा, अर्थ, नियोजन, कृषी यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळली

**उपमुख्यमंत्री पदाची कारकीर्द**

अजित पवार हे महाराष्ट्रातील सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यांपैकी एक आहेत.

२०१० – २०१४

काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकार

अर्थ व जलसंपदा मंत्री

नोव्हेंबर २०१९ (थोडक्यात कालावधी)

देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्री

डिसेंबर २०१९ – जून २०२२

महाविकास आघाडी सरकार

अर्थमंत्री

जुलै २०२३ – आजपर्यंत

भाजप–शिवसेना (शिंदे गट) सरकार

> अजित पवार : राजकीय कारकीर्द – सविस्तर माहिती
>
> वैयक्तिक परिचय
>
> पूर्ण नावः अजित अनंतराव पवार
>
> जन्मः २२ जुलै १९५९
>
> जन्मस्थानः पुणे जिल्हा, महाराष्ट्र
>
> कुटुंबः राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांचे पुतणे
>
> शिक्षणः कृषी विषयक शिक्षण
>
> राजकीय पक्षः राष्ट्रवादी काँग्रेस (मूळ), सध्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)

उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री

**अर्थमंत्री म्हणून ओळख**

कठोर अर्थशिस्त

विकासाभिमुख अर्थसंकल्प

सिंचन, रस्ते, कृषी आणि पायाभूत सुविधांवर भर

"काम बोलते" ही त्यांची राजकीय ओळख

**नेतृत्वशैली**

थेट, स्पष्ट आणि आक्रमक

निर्णय पटकन घेणारे नेता

प्रशासकीय अधिकाऱ्यांवर पकड

विकासकामांवर लक्ष

# गोंदियात प्रजासत्ताक दिवस 'सतनाम नशामुक्ती केंद्रात' उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोडजिल्हा प्रतिनिधी गोंदिया:** स्व. झुलनबाई बहुउद्देशीय संस्था, गोंदिया द्वारे संचालित सतनाम नशामुक्ती केंद्रात २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशप्रेमाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने केंद्रातील लाभार्थी आणि कर्मचाऱ्यांनी "व्यसनमुक्त भारत" घडवण्याचा सामूहिक संकल्प केला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. लोकेश चिर्वतकर उपस्थित होते. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून सुभाष सोनवणे,संस्थेचे सचिव टि.वाय. चिर्वतकर, संस्थेचे




उपाध्यक्ष सचिन बन्सोड, सदस्य सुनिता सव्वालाके आणि सारिका ब्राह्मणकर, मदन राऊत प्रामुख्याने उपस्थित होते.

**व्यसनमुक्ती हाच खरा देशविकास**

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ . लोकेश चिर्वतकर यांनी आपल्या भाषणात प्रतिपादन केले की, "देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी तरुण पिढी व्यसनमुक्त असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रजासत्ताक दिनी आपण सर्वांनी केवळ ध्वजवंदन न करता, समाजातील अमली पदार्थांच्या विळख्यातून तरुणांना बाहेर काढण्यासाठी कटिबद्ध झाले पाहिजे."

संस्थेचे सचिव टि.वाय. चिर्वतकर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत, नशामुक्ती केंद्राच्या माध्यमातून अनेक कुटुंबे पुन्हा उभी राहत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

**विविध उपक्रम आणि उत्साह**

यावेळी केंद्रातील कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला केंद्रातील सर्व कर्मचारी, आरोग्य सेवक आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली आणि त्यानंतर उपस्थितांना अल्पोपहार वाटप करण्यात आले. स्व. झुलनबाई बहुउद्देशीय संस्थेच्या या उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# लांनो सोळाव बर्ष धोक्याच नाही आयुष्य घडवायचे आहे मार्गदर्शक दिलीप आमले व्यसनमुक्ती जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**नेरुळ प्रतिनिधी :** नवी मुंबई उप प्रादेशिक परिवहन विभाग नवी मुंबई वाहतूक पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने अंकिता मोटर ट्रेनिंग स्कूल शिव वाहतूक सेना नवी मुंबई यांच्या सहकार्याने 29 वा रस्ता सुरक्षा सप्ताह नवी मुंबई महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांबरोबर वाहतूक नियमाचे बाबतीत संवाद साधून विद्यार्थ्यांना वाहतूक नियमाचे पुस्तके वाटप करण्यात आले यावेळी श्री संजय नकाते मोटार वाहन निरीक्षक यांनी विद्यार्थ्यांना लायसन नसल्यास व गाडीचे पेपर नसल्यास किती दंड याबाबत संवाद साधला सौ संगीता आमले संचालिका अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल यांनी सर्व अधिकारी कर्मचारी यांचे स्वागत केले व प्रश्न उत्तर देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे साहित्य अंकिता मोटर ट्रेनिंग स्कूलच्या वतीने बक्षीस रूपाने वाटप करण्यात आले यावेळी कार्यक्रम आयोजक सूत्रसंचालक




आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले यांनी व्यसनमुक्ती जनजागृती या विषयावर मुलांशी संवाद साधला शेकडो मुलांकडून मी कधीच व्यसन करणार नाही अशी प्रतिज्ञा करून घेतली यावेळी नवी मुंबई वाहतूक विभाग सिवुड श्री कोरडे साहेब यांनी सर्व विद्यार्थ्यांनी रस्त्यावर चालताना कसे चालावे याबाबतीत विशेष माहिती दिली यावेळी प्रमुख उपस्थिती श्री संजय नकाते मोटार वाहन निरीक्षक परिवहन विभाग श्री दिलीप किसनराव आमले प्रमुख व्यसनमुक्ती जनजागृती श्री अरुण कोरडे सब इन्स्पेक्टर वाहतूक विभाग सौ संगीताताई दिलीप आमले संचालिका अंकिता मोटर ट्रेनिंग स्कूल शाळेच्या मुख्याध्यापिका सौ छाया कदम वाहत विभागाचे कर्मचारी व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका व शेकडो मुले उपस्थित होती.

# महाराष्ट्रातल्या राजकारणातील 'दादा'

अजितदादा म्हटलं की समोर येतं ते धारदार आवाज आणि स्पष्टवक्तपणा असलेलं रांगडं व्यक्तिमत्व. समोरच्याचं काम होत असेल तर करणारच आणि होत नसेल तर त्याला नाही म्हणून तोंडावर सांगणारा नेता म्हणजे अजित पवार.त्याच अजित पवारासाठी आणि महाराष्ट्रासाठी बुधवारची सकाळ अतिशय धक्कादायक ठरली. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमाान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला.बारामतीत लँडिंगदरम्यान अजित पवार यांचं विमान कोसळलं आणि त्याला भीषण आग लागली. या दुर्दैवी अपघातात अजित पवार यांच्यासह ६ जणांचा मृत्यू झाला.

२२जुलै १९५९ साली जन्मलेले अजित पवार यांचा राजकारणात मोठा दबदबा होता.१९८२ साली त्यांनी स्थानिक राजकारणात प्रवेश केला. अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक असे नाव होते ज्यांनी अनेक दशकं सत्ता आणि संघटना दोन्हीवर मजबूत पकड राखली. अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात लवकरच स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांचे काका शरद पवार यांच्यासोबत त्यांनी काँग्रेस पक्ष आणि नंतर फुटलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.भल्या पहाटे उठून काम करणाऱ्या नेत्यांमध्ये अजित पवार यांचं हमखास नाव घेतलं जायचं.७ वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याचा रेकॉर्ड त्यांच्या नावे होता. प्रशासनावर असलेला त्यांचा वचक आणि राजकारणतला त्यांचा दबदबा सर्वश्रुत होता.

२०१९ हे वर्ष अजित पवारांच्या राजकीय कारकिर्दीसाठी प्रत्येक अर्थाने नाट्यमय होते. अजित पवारांनी त्यांचे काका आणि पक्षप्रमुख शरद पवार यांच्याविरुद्ध पहिले उघड बंड केले. त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री करण्यासाठी भाजपशी अनपेक्षित युती केली आणि ते स्वतः उपमुख्यमंत्री झाले. तथापि, तीन दिवसांनी त्यांनी राजीनामा दिला आणि भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारचा पाठिंबा काढून घेतला. यामुळे फडणवीस यांना राजीनामा द्यावा लागला. या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अटकळाची लाट उसळली आणि निष्ठा आणि महत्त्वाकांक्षेबद्दल वादविवाद तीव्र झाले.

डिसेंबर २०१९ मध्ये, अजितदादा शरद पवारांच्या बाजूने परतले आणि उद्धव ठाकरे यांच्या महाविकास आघाडीच्या अंतर्गत उपमुख्यमंत्री म्हणून सरकारमध्ये पुन्हा सामील झाले. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये त्यांचा प्रभाव निर्माण करण्यासाठी आणि त्यांचे स्थान पुन्हा परिभाषित करण्याच्या त्यांच्या रणनीतीचा एक भाग म्हणून हे पाऊल पाहिले गेले. परंतु जुलै २०२३ मध्ये, महाविकास आघाडी सरकार कोसळल्यानंतर, अजित पवार यांनी पुन्हा एकदा त्यांच्या काकांच्या विरोधात बंड केले. यामुळे त्यांच्या पक्षात फूट पडली आणि ते भाजप-एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना सरकारमध्ये सामील झाले.

अजित पवार यांनी महाराष्ट्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाची खाती सांभाळली आहेत. विशेषतः अर्थमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द लक्षवेधी राहिली. सलग अनेक अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. सिंचन, जलसंपदा, अर्थ आणि नियोजन यांसारख्या खात्यांमध्ये त्यांनी धाडसी निर्णय घेतले. काही निर्णयांवरून ते वादातही सापडले, मात्र प्रशासकीय पकड असलेला नेता म्हणून त्यांची प्रतिमा कायम राहिली.




राजकारणात कितीही विरोधात असले तरीही पवार कुटुंब नेहमी एकत्र असायचं. कोणत्याही कार्यक्रमात संपूर्ण पवार कुटुंब एकत्र दिसायचे. अजित पवार हे अत्यंत मिश्कील व्यक्तिमत्त्व होते. ते नेहमी जनतेच्या सेवेसाठी काम करायचे. त्यांनी राज्यासाठी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून काम केल होते. सुस्पष्ट दृष्टिकोन, काटेकोर नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी ही त्यांची खास ओळख होती.

चाकण येथील जाहीर सभेत अजित पवार म्हणाले होते की, "राजकारण लय वंगाळ आहे. जमिनीचे पैसे आले असतील तर राजकारणात पडू नका. धंदा-पाणी करा, मस्तपैकी राहा, मुलाबाळांना चांगलं शिकवा आणि निर्व्यसनी जीवन जगा. काहींना जमिनीचे पैसे आले की लगेच राजकारणात उडी घ्यायची हौस होते. बायकोला उभं करा, तू निवडणूक लढ..असं करू नका. पैसे संपले की काय करणार? दोन हाताला चुना लावून 'ठो-ठो' करणार? त्याचा काहीच उपयोग नाही, साधुसंतांनीही आपल्याला तेच सांगितले असल्याचे नमूद करत अजित पवारांनी "धंदा-पाणी सांभाळा, आयुष्य नीट जगा असा सल्ला लोकांना दिला होता. राज्याच्या राजकारणातील एक असा नेता, ज्याच्या घड्याळाच्या काट्यावर अख्खं प्रशासन धावायचं. ज्यांच्या एका शब्दाला शब्दाचे वजन असायचे आणि ज्यांनी 'पहाटेची कामाची वेळ' ही आपली ओळख बनवली होती, त्या अजित दादांच्या निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि अवघा महाराष्ट्र सुन्न झाला. बारामतीच्या मातीत विमानाचा झालेला तो अपघात केवळ एका विमानाचा अपघात नव्हता, तर तो महाराष्ट्राच्या राजकारणातील एका धगधगत्या पर्वाचा अकाली अस्त होता.

अजित पवार म्हणजे केवळ एक राजकीय नाव नव्हतं, तर ती एक कार्यपद्धती होती. पहाटे ५ वाजता कामाला सुरुवात करून प्रशासकीय यंत्रणेला कामाला लावणारा हा लोकनेता शेवटच्या श्वासापर्यंत जनतेच्या कामासाठीच धावत होता.

बारामतीच्या मातीतून उठलेले वादळ आज त्याच मातीला शांत झाले! मा.अजितदादा यांच्या दुर्दैवी निधनाच्या बातमीने आज संपूर्ण महाराष्ट्र हादरला आणि दुःखी झाला आहे.

**श्री दत्ता श्रावण खंदारे**
**धारावी**

# शिवसेना रिसोड तालुका उपाध्यक्ष पदि श्री गजानन देशमुख यांची विधानपरिषद आमदार भावना ताई गवळी यांनी नियुक्ती पत्र देऊन केली निवड

**दैनिक युवक आधार**

**रिसोड. प्रतिनिधी/ रणजितसिंह ठाकुर :** भावनाताई गवळी यांचे कट्टर समर्थक तथा सामाजिक कार्यकर्ते श्री गजानन देशमुख यांची विधानपरिषद आमदार तथा शिवसेना नेत्या भावना ताई गवळी पाटील यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत दि 27 जानेवारी 2026 ला नियुक्ती पत्र देऊन रिसोड तालुका उपाध्यक्ष पदी निवड केली. गजानन देशमुख हे 2016 पासून सामाजिक कार्यात अग्रेसर असून प्रत्येकाच्या सुख दुःखात त्यांचा खारीचा वाटा असून जाती भेद पक्षपात न करता प्रत्येक कार्यात ते हजर असतात. आतापर्यंत श्री जनार्धन किसनराव देशमुख (वडील)आणि श्री गजानन जनार्धन देशमुख या दोघा बापलेकानी घरावर तुळशी पत्र ठेऊन सामाजिक काम करत आलेत.श्री जनार्धन देशमुख हे सुद्धा स्व. पुंडलिकराव गवळी यांच्या समवेत शिवसेनेत काम करत होते त्याच पावलावर पाउल ठेवत आणि भावना ताई गवळी यांच्या विकासात्मक धडाकेबाज काम करण्याच्या विचारधारेवर शिवसेनेमध्ये युवा सेना जिल्हाध्यक्ष श्री प्रदिप पाटील मोरे आणि गोरख बोरकर यांच्या माध्यमातून प्रवेश घेतला होता.कोणतीही अपेक्षा न ठेवता सामान्य जनतेचे शिवसेना पक्ष्या च्या माध्यमातून त्यांनी काम सुरु ठेवले आणि जिल्हाप्रमुख श्री महादेवरावजी ठाकरे साहेब आणि तालुका प्रमुख श्री मच्छिंद्र पाटील ढोणे यांनी याबतीत सकारात्मक भूमिका घेत श्री गजानन देशमुख यांची रिसोड तालुका उपाध्यक्ष पदी निवड केली. या जबाबदारीच्या व विश्वासाच्या पदावर निवड होणे हा रिसोड तालुक्यासाठी अत्यंत अभिमानाचा व आनंदाचा क्षण आहे. सामान्य जनतेशी आपुलकीने वागणारे, कार्यकर्त्यांच्या सुख-



दुःखात नेहमी पुढे असणारे, पक्षनिष्ठा, प्रामाणिकपणा व कष्ट यांचा आदर्श ठेवणारे नेतृत्व म्हणून गजानन भाऊ देशमुख ओळखले जातात. तळागाळातील कार्यकर्त्यांपासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत त्यांनी नेहमीच विश्वासाचे नाते जपले आहे. शिवसेनेच्या विचारधारेवर निष्ठा ठेवून, समाजसेवा, युवकांचे प्रश्न, शेतकरी व सर्वसामान्य माणसांच्या न्यायहक्कासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल म्हणूनच त्यांची या महत्त्वाच्या पदावर निवड झाली आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.ही निवड केवळ एक पद नसून, जनतेच्या विश्वासाची जबाबदारी आहे. गजानन भाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली रिसोड उपतालुक्यात शिवसेना अधिक बळकट होईल आणि सर्वसामान्य माणसाला न्याय मिळेल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.येणाऱ्या काळात शिवसेना पक्ष नेत्या विधान परिषद आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या मार्गदर्शनात पक्ष संघटन वाढीसाठी आणि सामान्य जनतेच्या हितासाठी कायम प्रयत्नशील राहू असे मत व्यक्त केले. सर्व गावकरी आणि मित्रमंडळीनि त्यांचा पुष्प गुच्छ व अंगावर गुलाल टाकून सत्कार केला. यावेळी यावेळी जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे, तालुका प्रमुख मच्छिन्द्र पाटील ढोणे, कपिल पाटीलकदम युवा सेना शहर प्रमुख,मा. सभापती विठ्ठल काका नरवाडे,उपजिल्हा प्रमुख नंदू भाऊ देशमुख,उपजिल्हा प्रमुख संजय भाऊ भुतेकर, प्रदीप पाटील मोरे युवा सेना जिल्हाध्यक्ष,अरुण मगर शहर प्रमुख,जिल्हा संघटक अनिल भाऊ गरकळ,वैद्यकीय तालुका प्रमुख प्रल्हाद कोकाटे,युवासेना उपशहर प्रमुख अतुल पवार,गजानन गव्हाणे ओबीसी तालुका प्रमुख, युवासेना तालुका अध्यक्ष नारायण खडसे पाटील, गोरख पाटील बोरकर युवा सेना संपर्क प्रमुख,

गजाननराव सरनाईक सर्कल प्रमुख, गणेश अंभोरे उपसर्कल प्रमुख, एकनाथ आढाव उपसर्कल प्रमुख, लक्ष्मण पवार, रतन बोरकर, भागवत जाधव, संदीप पवार व सर्व पदाधिकारी उपस्थितीत होते.

---

## प्रशासनावरील 'जरब' अन् कार्यतत्पर व धाडशी नेता हरपला; लोकनेत्याच्या निधनाने महाराष्ट्र शोकाकुल

### माजी आमदार भीमराव धोंडे यांची भावूक श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे :** महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावरील एक धडाडीचे ,कार्यतत्पर आणि प्रशासनावर जबरदस्त पकड असणारा नेता आज काळाच्या पडद्याआड गेला. त्यांच्या निधनाने संपूर्ण राज्याची मोठी हानी झाली आहे.या लोकनेत्याच्या जाण्याने सर्वसामान्य जनतेतून आणि राजकीय वर्तुळातून मोठी शोककळा पसरली आहे. जनतेतील एक हजरजवाबी आणि धाडसी नेता हरपला प्रशासनावरील 'जरब' अन् कार्यतत्पर व धाडशी नेता हरपला; लोकनेत्याच्या निधनाने महाराष्ट्र शोकाकुल अशा शब्दांत माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आपली भावूक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

आपला शोक संदेश देताना ते पुढे म्हणाले की, प्रशासनावर 'धाक' असणारे कार्यक्षम नेतृत्व होते. अजितदादा यांच्या



निधनाची बातमी समजताच संपूर्ण राज्यात शोकाकुल वातावरण निर्माण झाले आहे. आजित दादांच्या कार्यशैलीवर प्रकाश टाकताना ते म्हणाले की,असे नेतृत्व होणे आता कठीण आहे. पहाटेच उठून कामाला लागणारा हा नेता होता. कामाची प्रचंड उरक आणि कार्यतत्परता हे त्यांचे वैशिष्ट्य होते.विशेष म्हणजे प्रशासनावर त्यांची पकड इतकी जबरदस्त होती की, बड्या अधिकाऱ्यांवरही त्यांचा वचक आणि धाक असायचा. लोकांची कामे करून घेताना त्यांनी कधीही वेळ-काळ पाहिला नाही.

आता महाराष्ट्राचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाल.केवळ आक्रमकपणाच नव्हे तर हजर जवाबीपणा आणि कोणत्याही संकटात धावून जाण्याचे धाडस यामुळे हे नेतृत्व महाराष्ट्रभर लोकप्रिय होते. दादाच्या जाण्याने राज्याच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एक धडाडीचा आणि सर्वसामान्यांसाठी लढणारा नेता काळाने हिरावून नेला आहे.मी अजित दादांच्या नेतृत्वाखाली राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे. अलीकडेच मी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटात प्रवेश केलेला आहे ते आमचे जिल्ह्याचे पालकमंत्री तर होतेच आणि आमचा मोठा आधारही होता असेही भीमराव धोंडे यांनी आपल्या प्रतिक्रियेत नमूद केले.

## जि. प. उच्च प्राथमिक शाळा दुधा येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :** दुधा शासनाच्या प्रत्येक उपक्रमात अगदी हिरीरीने सहभाग घेणारी व मंठा तालुकास्तर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा यामध्ये मागील वर्षी प्रथम क्रमांक प्राप्त शाळा तसेच सर्व शालेय स्पर्धा मध्ये अग्रेसर असणारी शाळा म्हणजे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा . या शाळेने २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या औचित्याने विद्यार्थ्यांच्या विविध अंगी गुणांना वाव देणारे सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदनाचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर शासनाच्या आदेशानुसार संगीत कवायत



विद्यार्थी व पालकांच्या सक्रिय सहभागाने पार पडली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या गुणदर्शनासाठी भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर नृत्य, समूहगीत गायन, देशभक्तीपर गीत, नकला तसेच विविध थोर नेत्यांच्या जीवनावर आधारित प्रभावी भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळाल्यामुळे पालकांनी या कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमादरम्यान दुधा गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद देत आर्थिक स्वरूपात तसेच विविध वस्तुरूप बक्षिसांचा मोठ्या प्रमाणात वर्षाव केला. विद्यार्थ्यांनी परिधान केलेल्या विविध वेशभूषा व सादर केलेले नैपुण्य यामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच शोभा प्राप्त झाली.

या कार्यक्रमासाठी जि. प. उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील मुख्याध्यापक श्री. विजय कांगणे सर तसेच सहकारी शिक्षक श्री. निलेश पिसे व श्री. पंजाब दांदडे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच इतर प्रतिष्ठित नागरिक यांनी मोलाचे सहकार्य केले. एकूणच हा संपूर्ण कार्यक्रम आनंद, उत्साह व देशभक्तीच्या वातावरणात अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

---

## श्री क्षेत्र विठ्ठल गड येथे अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिभावात सांगता

**दैनिक युवक आधार**

**गेवराई प्रतिनिधी/भीमराव गावडे :** श्री क्षेत्र विठ्ठलगड संस्थानवर भगवंत कृपेने श्री. संत सम्राट नगदनारायण महाराज यांच्या कृपेने ह.भ.प.प. पु. गुरुवर्य वें.महादेव महाराज (श्री.क्षेत्र संस्थान नारायणगड) यांच्या आशिर्वादाने व तसेच ह.भ.प.सोनाबाई,शांताबाई महाराज यांच्या प्रेरणेने व ह.भ.प.प.पु.गुरुवर्य महंत शिवाजी महाराज (श्री. क्षेत्र संस्थान नारायणगड) यांच्या शुभहस्ते

श्री क्षेत्र नारायण गडाचे उत्तराधिकारी ह. भ.प.संभाजी महाराजांच्या कुशल अशा नेतृत्वाखाली चालू असलेला 101 वा अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता मोठ्या भक्तिभावात व उत्साहात पार पडली. सप्ताहाच्या सांगतेनिमित्त ह.भ.प.शिवाजी महाराज यांची श्री क्षेत्र विठ्ठल गड येथे भेट व



त्यानंतर ह.भ.प.संभाजी महाराज यांच्या सुमधुर, भावस्पर्शी व समाजप्रबोधनपर कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

सप्ताह काळात दररोज पहाटे काकडा आरती, सकाळी हरिपाठ, दुपारी रामायण व रात्री कीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. विठ्ठल नामाच्या जयघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात भक्तीमय व पावन वातावरण निर्माण झाले होते.सांगतेच्या दिवशी झालेल्या कीर्तनात महाराजानी आपल्या प्रभावी व ओघवत्या वाणीने संत परंपरा, भक्तीमार्गाचे महत्त्व, सदाचार, संयम, एकता व सामाजिक सलोखा यावर मार्गदर्शन केले तसेच आपल्या जीवनामध्ये आई-वडिलांची सेवा ,अन्नदान व गोसेवा करावी असे आवाहन केले व त्यांच्या कीर्तनातील अभंग, उदाहरणे व विनोदी शैलीने उपस्थित भाविक भारावून गेले. कीर्तनादरम्यान अनेक भाविकांनी टाळाच्या तालावर नामस्मरण करत भक्तिरसाचा अनुभव घेतला.

कार्यक्रमाच्या सांगतेनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सप्ताह यशस्वी होण्यासाठी ज्ञानोबाराय वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी,सप्ताह समिती, ग्रामस्थ, तरुण मंडळ तसेच सर्व हरिभक्तांनी मोलाचे सहकार्य केले.

# अजित दादा पवार: अनपेक्षित निरोपाने भरलेलं अंत आयुष्याचं अमूल्य सत्य

मृत्यू — जीवनाचं अंतिम, अटळ आणि अमोघ सत्य आहे. आपल्याला कधी, कुठे आणि कसा भेटेल, याची काहीही हमी नाही. सकाळी हसत-खेळत घराबाहेर गेलेली व्यक्ती संध्याकाळी तितक्याच हसत-खेळत परत येईल याची खात्री नसते. तरीसुद्धा आपण हे सत्य विसरून रोजच्या धावपळीत, ताण-तणावात आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली जगतो.

उद्याची चिंता, भविष्याची भीती, अजून काही मिळवायचं आहे या विचारात आजचा अमूल्य क्षण हातून निसटतो. अचानक घडणाऱ्या दुर्दैवी घटनांमुळे मन थांबते, डोळ्यात पाणी येते, आणि आयुष्य किती नाजूक आहे याची तीव्र जाणीव होते.

त्यानंतरच लक्षात येतं — पद, पैसा, प्रतिष्ठा, सत्ता… या सगळ्या गोष्टी अंतिम क्षणी आपल्याबरोबर जात नाहीत. फक्त येतं — माणुसकी, प्रेम, आपण केलेली चांगली-वाईट



कर्मे, आणि लोकांच्या मनात उरलेल्या आठवणी.

आयुष्यातील नात्यांकडे दुर्लक्ष करू नका. आई-वडिलांचा आदर करा, त्यांच्याशी प्रेमाने बोला. मैत्री जपा, शेजारधर्म पाळा. मनात राग, लोभ, मोह, मत्सर यांना जागा देऊ नका. सगळ्यांशी मनमोकळेपणाने बोला. माफ करायला शिका.

शांत मन ही खरी संपत्ती आहे. क्षणिक सुख, भौतिक मोहमाया ही तात्पुरती आहे. खरा धन आहे — कर्मातून मिळणारे आत्मिक समाधान, प्रेम आणि शांती. आपणास ठाऊक नाही समोरील पाच मिनिटांत काय होईल.

त्यामुळे आजचा प्रत्येक क्षण असा जगा की आजूबाजूच्या लोकांना आपल्याकडून आनंद मिळावा.

हीच शिकवण आपल्याला मिळाली आदरणीय अजित दादा पवार यांच्या आकस्मिक निरोपातून. कालपर्यंत दमदार व्यक्तिमत्त्व, निरोगी आरोग्य आणि ऊर्जावान नेतृत्व असलेले आमचे लाडके नेते, आज सकाळी सुमारे ८:४५ ते ९ वाजेदरम्यान आपल्या सोबतून कायमचे निघून गेले. विमानात चढताना घेतलेला हसरा निरोप — हा अखेरचा ठरला. आप्तपरिवार, सहकारी, कार्यकर्ते आणि संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे.

दैनिक युवक आधार परिवार व आदर परिवाराच्या वतीने आदरणीय अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

त्यांच्या आत्म्यास शांती लाभो. त्यांच्या सहकाऱ्यांच्या आत्म्यासही शांती लाभो. हीच ईश्वरचरणी प्रार्थना…

**शब्दांकन:**
**ज्योत्स्ना करवाडे**
**विदर्भ संपादिका, दैनिक युवक आधार**

---

## क्लासरूममध्ये कात्री-कंगवा! जिल्हा परिषद शाळेचा अनोखा उपक्रम - मुलांच्या स्वच्छतेला नवा चेहरा!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** (रिसोड)बिबखेडा, दि. २८ जानेवारी २०२६ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बिबखेडा येथे विद्यार्थ्यांच्या आरोग्य व वैयक्तिक स्वच्छतेसाठी एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. शाळेच्या आवारातच थेट ‘हेअर सलून’ उभारून सर्व विद्यार्थ्यांचे केस कापण्यात आले.

या उपक्रमासाठी चाफेश्वर हेअर सलूनचे संचालक तथा अनुभवी कारागीर विष्णू जाधव यांनी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी शाळेत येताना नीटनेटके, स्वच्छ व शिस्तबद्ध राहावे, हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू होता.

ग्रामीण भागातील अनेक पालकांना कामाच्या व्यापामुळे किंवा आर्थिक परिस्थितीमुळे मुलांच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष देता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांनी पुढाकार घेत हा उपक्रम यशस्वीपणे राबवला.

या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे



अध्यक्ष शिवशंकर नरवाडे म्हणाले,

“विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा आमचा उद्देश आहे. आरोग्य, शिस्त आणि स्वच्छता या तिन्ही गोष्टी त्यांच्या आयुष्यात महत्त्वाच्या आहेत. या उपक्रमामुळे मुलांमध्ये स्वच्छतेची सवय लागेल.”

कार्यक्रमाला उपाध्यक्ष विष्णू गिऱ्हे, सहकारी महादेव नरवाडे, मुख्याध्यापिका सौ. सिंधू सावंत, शिक्षिका भावना बोद्रे, सर्व शिक्षकवृंद, ग्रामस्थ शिवाजी नरवाडे, अश्रूजी दहातोंडे, परमेश्वर ढोणे व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या आरोग्य व शिस्तीला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरातून जोरदार कौतुक होत आहे.

**उपक्रमाचा उद्देश :** विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, शिस्त व आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे.

नाविन्यपूर्ण उपक्रम : शाळेतच ‘हेअर सलून’ उभारून सर्व विद्यार्थ्यांचे मोफत केस कापणे.

सहकार्य : चाफेश्वर हेअर सलूनचे संचालक विष्णू जाधव यांचे विशेष योगदान.

पुढाकार : शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकवृंद यांचा स्तुत्य सहभाग.

परिणाम : विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, आत्मविश्वास व शिस्तीची जाणीव वाढली.

# जागतिक अशांततेतून आर्थिक अस्थैर्याकडे

सध्या जगातील दोन-तीन खंडांमध्ये एकाच वेळी युद्धे सुरू असल्याचे चित्र आहे. लॅटिन अमेरिकेत तेल आणि दुर्मीळ खनिजांच्या लालसेपोटी अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांना कैद करून रातोरात अमेरिकेत नेल्याची घटना घडली. इराणकडील प्रचंड तेल साठ्यांमुळे इराणला ताब्यात घेण्याचे (अगदी सशस्त्र मार्गानेही) प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येते.

रशियाच्या सीमेलगत असलेल्या युक्रेनकडेही युरोप, रशिया आणि अमेरिका या सर्वांचे लक्ष आहे. ‘युरोपचे धान्यकोठार’ असलेल्या या देशाची गेली दोन वर्षे युरोपच्या मदतीने रशियाविरुद्ध अस्तित्वाची लढाई सुरू आहे. मध्यपूर्वेत, इस्रायल पॅलेस्टिनी भूभाग पूर्णत: ताब्यात घेण्याच्या प्रयत्नात आहे. त्याच वेळी अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पॅलेस्टाइन पर्यटनासाठी विकसित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. आशिया खंडात जपानलगतच्या समुद्रात चीन जलआक्रमणाच्या तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत. एकूण सध्या संपूर्ण जगावर या ना त्या प्रकारे युद्धाच्या भीतीचे सावट आहे.

दुसरीकडे, आता पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धाप्रमाणे मानवी सैनिक शस्त्रास्त्रांसह प्रत्यक्ष रणांगणावर लढत नाहीत. तर कोणत्या देशाकडे किती प्रगत, दूरवर मारा करणारी आणि विध्वंसक क्षमता असलेली शस्त्रास्त्रे आहेत, याची माहिती प्रसिद्ध केली जात आहे. त्यावरून संबंधित देशांवर दबाव निर्माण करण्याची व विजय मिळविण्याची क्षमता स्पष्टपणे दिसून येते.

आधुनिक युद्धांमध्ये केवळ शस्त्रांच्या बटणावर बोट ठेवले की काही क्षणांतच शत्रुराष्ट्रातील घरे, शाळा, इस्पितळे, सरकारी कार्यालये आणि मानवी जीवन यांचे प्रचंड नुकसान होते. अशा युद्धांमध्ये दोन्ही बाजूंनी प्रत्यक्ष मानवी फौजा रणांगणावर नसतात. पूर्वीची युद्धे मुख्यत: ‘मानव विरुद्ध मानव’ अशी असत, तर आजची ‘(परमाणू) शस्त्रे विरुद्ध शस्त्रे’ अशी होत असल्याचे दिसते. या विध्वंसाबरोबरच दीर्घकालीन प्रदूषण, तसेच हिरोशिमासारख्या घटनांचे झाले तसे मानवी जीवनावर होणारे दीर्घकालीन परिणाम व विकृती यांचाही गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे.

आज प्रत्येक देश विरोधी राष्ट्राला मुळापासून उखडून टाकू, मागमूसही ठेवणार नाही अशा भाषेचा वापर करत असल्यामुळे या परिस्थितीत किती प्रचंड क्रौर्य दडलेले आहे, याची जाणीव जनतेला होत आहे. प्रादेशिक तसेच जागतिक शांतता जणू काळाच्या ओघात हरवून गेली आहे.

**या परिस्थितीची कारणे**

सध्याच्या युद्धसदृश परिस्थितीला गेल्या ४०-५० वर्षांतील अनेक घटना जबाबदार असल्या, तरी त्या पचवत आणि सामावून घेत मानवी समाज व्यवहार करत आला आहे. मात्र इतिहास हेही सांगतो की काही राज्यकर्त्यांना ही संतुलित व्यवस्था उद्ध्वस्त केल्याशिवाय, आणि आपल्या मनाजोगे संकुचित निर्णय इतरांवर लादल्याशिवाय समाधान मिळत नाही.

जागतिक हिताच्या घोषणा देत उद्दिष्टे मात्र एका देशापुरती ठेवण्याची प्रवृत्ती पूर्वीही दिसून आली आहे. उरल पर्वतरांगेतील विपुल संपत्ती व कच्च्या मालाचे साठे, अफाट जंगलांनी व्यापलेला सायबेरिया आणि युक्रेनची सुपीक भूसपाटी जर्मनीच्या ताब्यात आली, तर जर्मन जनता सुख-समृद्धीत लोळू लागेल, असे उद्गार १२ सप्टेंबर १९३६ रोजी न्युरेंबर्ग येथे हिटलरने काढले होते. डोनाल्ड ट्रम्प यांची सध्याची वक्तव्ये यापेक्षा वेगळी नाहीत. राष्ट्रवादाचा मुखवटा धारण करून साम्राज्यवादाचा अट्टहास यांतून दिसून येतो.

आजच्या परिस्थितीमागील दोन मूलभूत कारणे लक्षात घेण्यासारखी आहेत. एक म्हणजे अमेरिकेचे प्रचंड प्रमाणात वाढलेले सार्वजनिक कर्ज आणि दुसरे म्हणजे ‘अमेरिकेला पुन्हा महान करू या’ ही घोषणा. एखाद्या देशाने आपले सार्वजनिक कर्ज कमी करावे किंवा आपल्या अर्थव्यवहारांचा विस्तार करावा, यामध्ये काहीही गैर नाही. परंतु इतर देशांवर मनमानी पद्धतीने प्रचंड कर आणि प्रशुल्क लादून ही उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न केला जात असेल, तर त्यासाठी आवश्यक असलेले नैतिक अधिष्ठान नष्ट होते आणि त्यातूनच आजसारखी अस्थिर परिस्थिती निर्माण होते.

उदाहरणार्थ, भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर त्यावर जादा प्रशुल्क लावायचे; कोणीही रशियाशी सामान्य व्यापारसंबंध ठेवले तरी अतिरिक्त कर लावायचे; व्हेनेझुएलाकडून तेल घेतले तर दंडात्मक कर आकारायचे; तसेच इराणशी व्यापारसंबंध ठेवले तरी वाढीव कर लावायचे, हे धोरण आंतरराष्ट्रीय नैतिकतेत आणि मुक्तव्यापाराच्या व्यवहारांत कुठेही बसत नाही. आंतरराष्ट्रीय व्यापार खुला असावा, कर कमी असावेत आणि कोणत्याही देशाने जगात कुठूनही वस्तू खरेदी कराव्यात, हा आग्रह जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेच्या वेळी अमेरिकेनेच धरला होता; मग आज त्याच तत्त्वांपासून अमेरिका स्वत:च माघार का घेते, हा प्रश्न उपस्थित होतो.

स्वत:च्या संपत्तीवृद्धीसाठी इतर देशांमधील श्रमिकांना बोलावून घेणे, त्यांच्याकडून रात्रंदिवस काम करून घेणे आणि आर्थिक परिस्थिती थोडीशी कठीण होताच त्याच तरुणांना देशाबाहेर जाण्यास सांगणे— ही कोणत्या प्रकारची नैतिकता आहे? या धोरणांचा परिणाम असा झाला की व्हेनेझुएलाच्या परिसरातील अनेक लॅटिन अमेरिकन देश अमेरिकेच्या विरोधात उभे राहिले.

रशियाच्या तेलविक्रीवर गळचेपी करणे आणि आपल्या देशात येणाऱ्या तयार मालावर अतिशय उच्च दराचे कर लावणे, या अमेरिकेच्या धोरणांमुळेच इतर देशांना परस्पर सलोख्याचे आणि पर्यायी व्यापारसंबंध निर्माण करण्यास प्रवृत्त केले गेले, हे नाकारता येत नाही. याचे उदाहरण म्हणजे भारताने जपान आणि ब्रिटनबरोबर नव्याने केलेले व्यापार करार तसेच युरोपबरोबर झालेला भव्य व्यापार करार. या घडामोडींमधून अमेरिका आंतरराष्ट्रीय पातळीवर एकाकी पडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. ‘पुन्हा महान होण्याच्या’ अट्टहासापोटी अमेरिकेने आज भारत, चीन, रशिया, इराण आणि लॅटिन अमेरिकेतील अनेक देशांशी आर्थिक आणि संरक्षण क्षेत्रात वैमनस्य स्वीकारल्याचे दिसते. परिणामी, अमेरिकेचे सार्वजनिक कर्ज कमी होईल का आणि अमेरिका खरोखरच पुन्हा महान होऊ शकेल का, या दोन्ही उद्दिष्टांवर तिच्याच वर्तनामुळे गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

भारत सध्या अनेक अंगांनी अडचणीत सापडल्याचे चित्र दिसते. उदाहरणार्थ, इस्रायलशी असलेली भारताची मैत्री त्यांच्याकडून तांत्रिक साहाय्यामुळे इतकी घट्ट झाली आहे की पॅलेस्टिनी जनतेवर होत असलेल्या भीषण अन्यायाविरुद्ध भारत उघडपणे बोलू शकत नाही. इराणकडून मिळणाऱ्या तेलाच्या लाभासह चाबहार बंदर (युरोपकडे जाण्याचा महत्त्वाचा मार्ग) विकसित करण्यासाठी भारताने इराणशी करार केला असल्यामुळे, तो अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्याशी एकाच वेळी निर्बंधमुक्त मैत्री ठेवू शकत नाही. त्यामुळे तो रद्द करण्याइतपत दबाव भारतावर आहे.

युक्रेन आणि रशिया या दोन्ही देशांशी भारताचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक संबंध असल्यामुळे, त्या दोन राष्ट्रांमधील भीषण युद्धात भारत कोणाचीही उघड बाजू घेऊ शकत नाही. तसेच, ट्रम्प शासनाचा, व्यापार व चलन व्यवहार निर्माण होणारा स्पर्धक, ब्रिक्स समूह (व्हेनेझुएलासह) कमकुवत किंवा उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न असताना, भारत अमेरिकेला सहकार्य करू शकत नाही; कारण भारत या समूहाचा महत्त्वाचा सदस्य आहे. यामुळे भारताकडून जनतेला ज्या ठाम भूमिका आणि घोषणांची अपेक्षा होती, त्या प्रत्यक्षात दिसून येत नाहीत.

युद्धातील प्राणहानी, पशुहानी आणि शस्त्रहानीमुळे सामाजिक-सांस्कृतिक विकासाची पीछेहाट होते. हेच तत्त्व आजच्या परिस्थितीलाही तंतोतंत लागू होते. युद्ध सुरू होण्यापूर्वी आणि ते सुरू असताना धान्य, धातू आणि कारागिरी यांचा वापर वाढत्या प्रमाणात होतो. युद्ध चालविण्यासाठी प्रचंड आर्थिक संसाधने लागतात; परिणामी त्या काळात चलनवाढ (वॉरटाइम इन्फ्लेशन) मोठ्या प्रमाणावर अनुभवास येते. कोणीही जिंकला वा हरला तरी युद्ध संपल्यानंतर युद्धकाळात निर्माण झालेली सर्व प्रकारची वाढलेली मागणी अचानक कमी होते. परिणामी युद्धोत्तर काळात मंदी, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता तीव्र स्वरूपात समोर येते. हे पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतरही स्पष्टपणे दिसून आले आहे. आजही युद्धोत्तर अस्थिरता, आर्थिक मंदी आणि बेरोजगारी हे मुद्दे जगभरातील सरकारे, भांडवल बाजार आणि सामान्य समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरत आहेत.

**भारतासाठी उपाय काय?**

अशा परिस्थितीत निर्माण होणारी आर्थिक संकटे पूर्णपणे बाजारव्यवस्थेवर सोपवून देणे भारतासारख्या देशाला शक्य नाही. भारतीय संविधानाने जनतेला सन्मानजनक जीवनाचे आश्वासन मूलभूत अधिकारांच्या माध्यमातून दिले आहे. तसेच राज्याच्या धोरणांच्या निदेशक तत्त्वांमध्ये देशातील सर्व नागरिकांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्याय मिळेल, अशी व्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी राज्यावर सोपविण्यात आली आहे. विशेषत: राज्यसंस्थेने आर्थिक विषमता दूर करण्यासाठी सक्रिय भूमिका घ्यावी, असा स्पष्ट निदेश संविधानात दिला आहे.

अनुच्छेद ३९(अ) नुसार प्रत्येक नागरिकाला पुरेशा उपजीविकेची साधने उपलब्ध करून देणे हे राज्याचे कर्तव्य आहे. अनुच्छेद ३९(ब) नुसार देशातील भौतिक उत्पादनसाधनांची मालकी आणि नियंत्रण हे सामूहिक कल्याणाच्या दृष्टीने असावे, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच अनुच्छेद ३९(क) नुसार आर्थिक व्यवस्थेच्या कार्यपद्धतीमुळे उत्पादनसाधने आणि संपत्ती यांचे केंद्रीकरण होऊन सामान्य जनतेचे नुकसान होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. ही सर्व निदेशक तत्त्वे संविधानाच्या चौथ्या भागात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेली आहेत.

विकासाची प्रक्रिया या तत्त्वांच्या व्यावहारिक सीमांमध्ये सामावून घेतली गेली पाहिजे. ही तत्त्वे केवळ मार्गदर्शक स्वरूपाची नसून, कोणत्याही सरकारसाठी आणि कोणत्याही परिस्थितीत, मूलभूत निदेशक तत्त्वे आहेत, हे विशेषत्वाने अधोरेखित करणे महत्त्वाचे आहे.



# व्हिटॅमिन 'बी१२' ची कमतरता पूर्ण करण्यासाठी आहारात या शाकाहारी पदार्थांचा समावेश करा




आजच्या खानपानाच्या चुकीच्या सवयीमुळे शरीर आजाराचा घर बनत आहे. थकवा आणि अशक्तपणा हे वाढत आहे. या साठी शरीरात व्हिटॅमिन बी१२ ची कमतरता हे मुख्य कारण आहे.

असे मानले जाते की हे जीवनसत्व फक्त मांसाहारी पदार्थांमध्ये आढळते, परंतु जर तुम्ही शाकाहारी असाल तर काही पदार्थ फायदेशीर ठरू शकतात.

निरोगी नसा, डीएनए आणि लाल रक्तपेशी (आरबीसी) राखण्यासाठी व्हिटॅमिन बी१२ आवश्यक आहे. कमतरतेमुळे केवळ शारीरिक कमजोरीच उद्भवू शकत नाही तर स्मरणशक्ती कमी होणे आणि हातपायांमध्ये मुंग्या येणे यासारख्या समस्या देखील उद्भवू शकतात. शाकाहारी लोकांसाठी पूरक आहाराची शिफारस केली जाते, परंतु निसर्गात असे काही पदार्थ आढळतात जे औषधापेक्षाही वेगाने काम करतात.

**दुग्धजन्य पदार्थ**

दूध, दही आणि चीज हे व्हिटॅमिन बी१२ चे सर्वात सहज उपलब्ध आणि उत्कृष्ट स्रोत आहेत . तज्ञांचा असा सल्ला आहे की एक कप कमी चरबीयुक्त दही तुमच्या दैनंदिन व्हिटॅमिन बी१२ च्या गरजेचा एक महत्त्वाचा भाग पूर्ण करू शकते. मांस टाळणाऱ्यांसाठी चीज देखील उत्तम आहे.

**मशरूम**

शिताके मशरूम हे भाज्यांमध्ये व्हिटॅमिन बी१२ चा चांगला स्रोत मानले जातात. जरी त्यात कमी प्रमाणात असले तरी, नियमित संतुलित आहारात त्यांचा समावेश करणे फायदेशीर ठरू शकते.

**टेम्पे आणि आंबवलेले पदार्थ**

सोयाबीनपासून बनवलेले टेम्पे आणि आंबवलेले पदार्थ (जसे की इडली आणि डोसा पीठ) आतड्यांचे आरोग्य आणि व्हिटॅमिन बी१२ ची पातळी राखण्यास मदत करतात. किण्वन प्रक्रियेमुळे नैसर्गिकरित्या व्हिटॅमिनचे उत्पादन वाढते.

**पौष्टिक यीस्ट**

शाकाहारी आहारात पौष्टिक यीस्ट हे एक सुपरफूड आहे. त्यात व्हिटॅमिन बी१२ भरपूर असते आणि थोडासा चीजचा स्वाद असतो जो तुम्ही सूप किंवा सॅलडवर शिंपडू शकता.


जर तुम्हाला सतत चक्कर येणे, दृष्टी अंधुक होणे किंवा खूप झोप येणे असे वाटत असेल तर घरगुती उपचारांव्यतिरिक्त रक्त तपासणी करण्याचा विचार करा. जर व्हिटॅमिन बी१२ ची पातळी लक्षणीयरीत्या कमी झाली तर डॉक्टरांच्या सल्ल्याने पूरक आहार घेणे सर्वात सुरक्षित आहे.

# या पद्धतीने अक्रोड खाल्ल्याने नसांमधील कॉलेस्ट्रॉल लोण्यासारखे वितळेल

आजच्या चुकीच्या जीवनशैलीमुळे आणि अस्वस्थ खाण्याच्या सवयींमुळे, नसांमध्ये कोलेस्टेरॉल जमा होण्याची समस्या झपाट्याने वाढत आहे, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका वाढू शकतो.

या परिस्थितीत अक्रोड फायदेशीर आहे. लोक तरुण वयातच उच्च कोलेस्ट्रॉल आणि हृदयविकाराच्या झटक्यासारख्या समस्यांना बळी पडत आहेत.

पण तुमच्या स्वयंपाकघरातील एक सुपरफूड हा रामबाण उपाय असू शकतो. तज्ञांच्या मते, अक्रोड केवळ



मनाला तीक्ष्ण करत नाही तर हृदयाच्या नसांसाठी स्वच्छ करणारे म्हणून देखील काम करते.अक्रोड रक्तवाहिन्यांमध्ये अडकण्यापासून रोखतात. रक्तवाहिन्यांमध्ये एलडीएल (खराब कोलेस्ट्रॉल) जमा होणे हे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचे एक प्रमुख कारण आहे. अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. हे घटक रक्तवाहिन्यांमधील चरबीचे साठे कमी करण्यास आणि रक्ताभिसरण सुधारण्यास मदत करतात.

**अक्रोड खाण्याची योग्य पद्धत -**

बहुतेक लोक कोरडे अक्रोड खातात पण तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जर तुम्ही भिजवलेले अक्रोड खाल्ले तर त्याचा परिणाम दुप्पट होतो.

**फायदे-**

रात्रभर अक्रोड पाण्यात भिजवल्याने त्यातील फायटिक ॲसिडचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे शरीराला त्यांचे पोषक घटक चांगल्या प्रकारे शोषता येतात. त्यामुळे त्यांचे पौष्टिक मूल्य देखील संतुलित होते.

**रिकाम्या पोटी सेवन**

सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेले अक्रोड खाल्ल्याने चयापचय वाढतो आणि कोलेस्टेरॉल कमी करण्याची प्रक्रिया वेगवान होते.

**एका दिवसात किती अक्रोड खाणे योग्य आहे?**

कोणत्याही गोष्टीचे अतिरेक हानिकारक असू शकते. अहवालांनुसार, एका निरोगी व्यक्तीने दिवसातून २ ते ३ अक्रोड (संपूर्ण कर्नल) खावे. या अक्रोडातील फायबर तुम्हाला जास्त काळ पोट भरलेले ठेवते, जे वजन कमी करण्यास देखील मदत करू शकते.

# सुंदर दिसण्यासाठी ‘हे’ तेल आहे फायदेशीर; जाणून घ्या वापरण्याची पद्धत

महिला सुंदर दिसण्याकरिता एक ना अनेक उपाय करतात. स्वयंपाकघरात आढळणाऱ्या नैसर्गिक घटकांपासून ते बाजारात मिळणारे विविध सौंदर्यवर्धक प्रोडक्टचा वापर महिला करतात. परंतु बाजारातील केमिकलयुक्त प्रोडक्ट त्वचेकरिता हानिकारक ठरू शकतात. कारण त्यात विविध प्रकारची रसायने समाविष्ट केली असतात. मात्र, तज्ञ नैसर्गिक सौंदर्य वाढवण्यासाठी दिनचर्येत मोरिंगा ऑइलचा समावेश करण्याची शिफारस करतात. तुम्ही मोरिंगाच्या आरोग्यदायी फायद्यांबद्दल ऐकलं असेलच, पण तुम्हाला माहित आहे का की ते आपल्या आरोग्यासोबतच आपल्या त्वचेसाठीही फायदेशीर आहे? होय, तज्ञ म्हणतात की, आजकाल महिला चमकदार आणि मऊ त्वचेसाठी मोरिंगा ऑइल वापरत आहेत. वाळवलेल्या मोरिंगा



बियाण्यांपासून तयार केलेलं हे ऑईल सौंदर्य वाढण्यासाठी खूप प्रभावी मानलं जातं. या लेखात मोरिंगा तेल त्वचेसाठी कसे फायदेशीर आहे ते जाणून घेऊया.

**चमकदार त्वचेसाठी:** तज्ञांचं म्हणणं आहे की, प्रदूषणामुळे खराब झालेली त्वचेवर मोरिंगा तेल लावण्याने त्वचा पुनर्संचयित होण्यास मदत होते. दैनंदिन कामांमुळे होणारा थकवा आणि तणाव यापासून देखील मोरिंगा तेल आराम देते. असंही सुचवलं जाते की, या तेलाचा नियमित वापर केल्याने त्वचा केवळ मऊच राहात नाही तर ती तेजस्वी देखील होते.

**मॉइश्चरायझिंग:** तज्ञांचं म्हणणं आहे की, मोरिंगा तेल कोरड्या त्वचेसाठी फायदेशीर आहे. ते त्वचेच्या आतील थरांमध्ये प्रवेश करते आणि मॉइश्चरायझ करते. तसंच मोरिंगा ऑइल चिकट नसते आणि फाटलेल्या ओठांना आराम देण्यासाठी ते लावण्याची शिफारस केली जाते. त्यात असलेले फॅटी ॲसिड, जीवनसत्त्वे आणि खनिजे त्वचेला पुरेसा ओलावा आणि पोषण देतात.

**वयाच्या डागांपासून संरक्षण:** तज्ञांचं म्हणणं आहे की, मोरिंगा तेलातील अँटीऑक्सिडंट्स मुक्त रॅडिकल्सशी लढतात आणि त्वचा तरुण आणि निरोगी ठेवतात. व्हिटॅमिन सी कोलेजन उत्पादन वाढवते आणि त्वचेला सुरकुत्या होण्यापासून वाचवते. म्हणूनच, तज्ञ वयाचे डाग टाळण्यासाठी खबरदारी घेण्याची शिफारस करतात. तज्ञांचे म्हणणे आहे की जर तुमच्या चेहऱ्यावर बारीक सुरकुत्या असतील तर त्या हळूहळू नाहीशा होऊ शकतात. आंघोळीनंतर त्वचेवर हे तेल लाऊन हलक्या हाताने मालिश केल्यास ते दिवसभर मॉइश्चरायझ राहते. ज्यांना दिवसा तेल लावण्यास कठीण वाटते ते झोपण्यापूर्वी त्यांच्या त्वचेवर लावू शकतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ फार्मास्युटिकल रिसर्च अँड ॲप्लिकेशन्सनुसार, मोरिंगा तेलात अँटीमाइक्रोबियल, अँटीबॅक्टेरियल, अँटीऑक्सिडंट, अँटीफंगल आणि अँटी-एजिंग गुणधर्म असतात, जे सुरकुत्या आणि निस्तेज त्वचेसारख्या वृद्धत्वाच्या परिणामांसह अनेक त्वचेच्या समस्यांमध्ये मदत करतात.

**केसांसाठी:** मोरिंगा ऑइल केवळ त्वचेलाच नाही तर केसांनाही मॉइश्चरायझ करते. ओल्या केसांमध्ये थोड्या प्रमाणात मोरिंगा ऑइल हलक्या हाताने मसाज केल्यास केस चांगले होतात.

या तेलाचा नियमित वापर केस मजबूत होतात आणि कोंडा आणि दुभंगलेल्या टोकांसारख्या समस्यांपासून मुक्तता मिळते, असं म्हटलं जातं.

याव्यतिरिक्त, तज्ञांचं म्हणणं आहे की, मोरिंगा ऑइल चेहरा स्वच्छ करण्यासाठी वापरले जाऊ शकते.